शुक्रवार, 8 जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 303
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 8 JULY 2022
adhunikkesari.com Adhunik Kesari
● YEAR-01 ● ISSUE-303 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


# पेट्रोल-डिझेल होणार स्वस्त ?

## कच्च्या तेलाच्या किमतीतील घसरण सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : जागतिक मंदीच्या काळात भारतासाठी दिलासादायक बातमी आहे. कच्च्या तेलाच्या किमतीतील घसरण सुरूच आहे. आता ही घसरण प्रति बॅरल १०० डॉलरपर्यंत खाली आली आहे. गेल्या व्यापार दिवसांत तीन महिन्यांच्या निचांकी पातळीवर पोहोचल्यानंतर गुरुवारी किंमत खाली आली आहे. क्रूडच्या किमती कमी झाल्यामुळे देशात पेट्रोल आणि डिझेल स्वस्त होण्याची अपेक्षा वाढली आहे.**

बिझनेस टुडेच्या अहवालानुसार, कच्च्या तेलाच्या किमतीत सातत्याने होत असलेल्या घसरणीमुळे ते जवळपास तीन महिन्यांच्या निचांकी पातळीवर आले आहे. गुरुवारीही सुरुवातीच्या व्यापारात तेलाच्या किमती घसरल्या. याचे कारण असे की, संभाव्य जागतिक मंदीच्या भीतीमुळे तेलाच्या मागणीबाबत चिंता वाढली आहे. ब्रेंट क्रूड LCOC१ फ्युचर्स ७१ सेंटने घसरून ९९.९८ प्रति बॅरल डॉलर झाला. WTI क्रूड CLC१ फ्युचर्स ६२ सेंटने घसरून ९७.९१ प्रति बॅरल डॉलर झाला आहे.

WTI क्रूड ८ टक्क्यांनी आणि ब्रेंट क्रूड ९ टक्क्यांनी घसरले. नवीन माहिती, उत्पादन आणि वापराविषयीच्या चिंता तेलाच्या किमती खाली आणत आहेत, असे एसपीआय ॲसेट मॅनेजमेंटचे व्यवस्थापकीय भागीदार स्टीफन इन्स यांनी म्हटले. बाजारातील स्रोतांवर विश्वास ठेवला तर बुधवारच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की गेल्या आठवड्यात यूएस क्रूडचा साठा सुमारे ३.८ दशलक्ष बॅरलने वाढला आहे. तर गॅसोलीनचा साठा १.८ दशलक्ष बॅरलने कमी झाला आहे.

रशिया आणि युक्रेनचे युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या



किमतीत मोठी वाढ झाली आहे. या काळात क्रूडची किंमत २००८ च्या उच्च पातळीवर पोहोचली आणि प्रति बॅरल १३९ डॉलरवर पोहोचली. त्यानंतर किंमत कमी झाली आणि आता पुन्हा क्रूड १०० डॉलर प्रति बॅरलवर आले आहे. आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती एक डॉलरने वाढल्या तर भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ५० ते ६० पैशांनी वाढतात. त्याचप्रमाणे क्रुडच्या किमतीत घट झाल्यास पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही कपात होण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञांच्या मत आहे.

### आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूडचा दर महत्त्वाचा

भारतातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ठरवण्यात आंतरराष्ट्रीय बाजारातील क्रूडचा दर महत्त्वाची भूमिका बजावतो. भारत कच्च्या तेलाचा मोठा आयातदार आहे. ८५ टक्क्यांहून अधिक कच्चे तेल बाहेरून खरेदी करतो. कच्च्या तेलाची किंमत अमेरिकन डॉलरमध्ये भारताला मोजावी लागते. अशा परिस्थितीत कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि डॉलरच्या मजबुतीमुळे देशांतर्गत पातळीवर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर परिणाम होतो. म्हणजेच इंधन महाग होऊ लागते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या तर भारताचे आयात बिलही वाढते.



# राज्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात मान्सून पूर्णपणे सक्रिय झालेला पाहायला मिळत आहे. मुंबई, कोकणसह राज्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. याचप्रकारे येत्या चार ते पाच दिवस राज्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे येते ४ ते ५ दिवस राज्यातील काही भागांना अलर्ट जारी केला जाऊ शकतो.

यापैकी पहिले २ ते ३ मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्रातील काही भागात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मराठवाड्यात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. तर, विदर्भात ही मुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**राज्यात मान्सूनचा जोरदार कमबॅक**

राज्यात पावसाचा जोर वाढताच आहे. मुंबई, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही पाऊस बरसतो. मुसळधार पावसामुळे कोल्हापुरातील पंचगंगा नदीची पाणी पातळी ५६ फुटांपर्यंत वाढली आहे. तर, इतर नद्याही ओसंडून वाहत आहेत. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बऱ्याच ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटनाही घडत आहेत. त्यामुळे याचा रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. मुंबईतही सोमवारपासून (४ जुलै) मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे काही ठिकाणी सखल भागात पाणी साचलेले पाहायला मिळाले. रेल्वे रुळांवरही पाणी साचल्याने लोकलच्या तिन्ही मार्गांवरील वाहतूक धीम्या गतीने सुरु आहे.

# 'अक्षय पात्र किचन'चे पंतप्रधान मोदींनी केले उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**वाराणसी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांचा संसदीय मतदारसंघ वाराणसीच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीत पंतप्रधानांनी 'अक्षय पात्र किचन'चे उद्घाटन केले. अक्षय पात्र किचनचे उद्घाटन केल्यानंतर, पीएम मोदी एलटी कॉलेजमधून रुद्राक्ष कन्व्हेन्शनल सेंटरसाठी रवाना झाले. वाराणसीत तयार करण्यात आलेल्या अक्षय पात्र किचनमध्ये एक लाख मुलांसाठी माध्यान्ह भोजन तयार केले जाणार आहे. शिवाय, अक्षय पात्र किचनमध्ये अनेक आधुनिक मशीन्स बसवण्यात आल्या आहेत. या किचनमध्ये बसवण्यात आलेले रोटी मेकिंग मशीन अवघ्या एका तासांत 40 हजार रोट्या तयार करेल.

तसंच 15 हजार स्क्वेअर मीटरमध्ये बनवलेले अक्षय पात्राचे स्वयंपाकघर बनवण्यासाठी 24 कोटी रुपये खर्च आला. स्वयंपाकघरात रोटी बनवण्याचे मशीन आहे. यामध्ये पीठ आपोआप मळूनही घेता येऊ शकते. दरम्यान, 8 जुलै रोजी अक्षय पात्र किचन 25 हजार मुलांसाठी अन्न देण्यास सुरुवात करेल. 6 महिन्यांनंतर एक लाख मुलांसाठी अन्न तयार केले जाईल. अक्षय पात्र फाऊंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष भरत दास यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात सेवापुरीतील शाळांमध्ये जेवण पोहोचवले जाणार आहे. या गटात 143 शाळा असून त्यापैकी 124 परिषद आणि 19 अनुदानित आहेत.

# ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांचा राजीनामा

## ५० खासदारांनी राजीनामा दिल्याने घेतला निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**लंडन :** ब्रिटनमध्ये राजकीय सत्तासंघर्षात आता पंतप्रधानांना राजीनामा देण्याची वेळ आली आहे. देशाचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी राजीनामा दिल्याचे वृत्त समोर आले आहे. गेल्या ४८ तासात त्यांच्या ५० हून अधिक मंत्री आणि खासदारांनी राजीनामा दिला आहे. बोरिस यांच्या सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव वाढत चालल्याने त्यांनी राजीनामा दिल्याचे समजते. विशेष म्हणजे ३६ तासांपूर्वी मंत्री झालेल्या मिशेल डोनलन यांनी देखील राजीनामा दिला.

ब्रिटिश मिडियाने दिलेल्या वृत्तानुसार पक्षाचे नेते म्हणून त्यांनी राजीनामा दिला आहे. पण त्यानंतर देखील ते काही वेळ पंतप्रधान असतील. याआधी बुधवारी बोरिस यांनी मोठा धक्का बसला होता. त्यांच्या मंत्रिमंडळातील तिघांनी राजीनामा दिला होता. बुधवार संध्याकाळपर्यंत १७ मंत्री आणि १२ संसदीय सचिवांनी तसेच विदेशात नियुक्त करण्यात आलेल्या सरकारच्या चार प्रतिनिधींनी राजीनामा दिले होते. राजीनामा दिलेल्या सर्वांनी बोरिस यांच्या कामाच्या पद्धतीवर आणि सॅक्स स्कॅडलचा मुद्दा उपस्थित केला होता. बोरिस यांच्या विरोधात कॅबिनेटमध्येच बंड झाले होते. तरी देखील पदावर राहण्याचा त्यांचा हट्ट होता. याआधी त्यांनी पद सोडण्यास नकार दिला होता. कॅबिनेटमधील सदस्यांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा त्यांनी केला होता.

### इन्फोसिसच्या नारायण मूर्तींचा जावई ब्रिटनचा पंतप्रधान होणार?

**ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्यावर पक्षातील ४० खासदारांनी राजीनामा दिल्यानं राजकीय दबाव वाढला होता. बोरिस जॉन्सन यांच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्री ऋषी सुनक यांनी राजीनामा दिल्यानंतर कन्झर्व्हेटिव्ह पक्षात राजीनाम्याची लाट सुरु झाली. जॉन्सन यांच्या मंत्रिमंडळातील ४ कॅबिनेट, २२ मंत्री आणि २२ खासदारांचे सचिव आणि इतर ५ जणांनी राजीनामा दिल्यानंतर बोरिस जॉन्सन पंतप्रधानपद सोडण्यास तयार आहेत. जोपर्यंत ब्रिटनच्या पतंप्रधानपदी नव्या व्यक्तीची निवड होत नाही तोपर्यंत जॉन्सन पदावर कायम राहणार आहेत. अर्थमंत्रिपदाचा राजीनामा देणारे ऋषी सुनक यांचं नाव पंतप्रधानपदाच्या शर्यतीत आहे. सुनक यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यास ब्रिटनचे ते भारतीय वंशाचे पहिले पंतप्रधान ठरतील.**


# आकासा एअरला हिरवा कंदील, लवकरच सुरू होणार सेवा

आधुनिक केसरी न्यूज




**नवी दिल्ली :** आकासा एअरला आज नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून एअर ऑपरेटर प्रमाणपत्र मिळाले. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार लवकरच एअरलाइन ऑपरेशन सुरू करू शकते. विमान कंपनीने सोमवारी त्यांच्या क्रू युनिफॉर्मचा पहिला लूक लाँच केला होता, तसेच 21 जून रोजी भारतातील पहिल्या बोईंग 737 मॅक्स विमानाची डिलिव्हरी घेतली होती. प्रमुख गुंतवणूकदार राकेश झुनझुनवाला यांचा पाठींबा असलेल्या आकासा एअर या विमान कंपनीने सोमवारी क्रू मेंबर्ससाठी निवडण्यात आलेल्या गणवेशाची पहिली झलक दाखवली होती. भारतातील लेटेस्ट एअरलाइन कंपनी या महिन्याच्या अखेरीस उड्डाण करण्यास सज्ज आहे. तसेच आकासा एअर ही पहिली भारतीय विमान कंपनी आहे ज्याने त्यांच्या फ्लाइट क्रूसाठी कस्टम ट्राउझर्स, जॅकेट आणि स्नीकर्स सादर केले आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# एक सोहळा : आगळावेगळा...

आधुनिक केसरी

२० मे २०२२ रोजी पुण्यात एका छोटेखानी हॉलमध्ये एक आगळावेगळा सोहळा पार पडला. हा सोहळा होता व्रतबंध किंवा मुंजीचा. हा व्रतबंध सोहळा होता माझा अतिशय गोड नातू चि. स्वराज याचा. पण मुंजीबद्दल बोलण्याआधी माझी मुलगी चि सौ सारिका हिच्या सासरच्या मंडळींची पार्श्वभूमी सांगणे मला आवश्यक वाटते. सारिकाने आंतरजातीय विवाह केला. तिच्या आनंदाखातर आम्हीही तो आनंदाने करून दिला. तिच्या सासरकडील मंडळी माळी समाजाची. पण तिच्या लग्नापासूनच तिच्या सासरकडची माणसे आणि आमच्यामध्ये एवढे प्रेमाचे ऋणानुबंध निर्माण झाले की जातपात हा विचार कुठल्याकुठे पळून गेला. ते आमचे झाले आणि आम्ही त्यांचे झालो.

सारिकाच्या सासरकडील मंडळी मूळ विदर्भातील खामगावची. खामगाव, शेगाव याठिकाणी त्यांचा समाज, नातेवाईक. तिच्या लग्नानंतर काही निमित्ताने या नातेवाईकांना भेटण्याचा योग आला, त्यांच्या घरी जाणे झाले. या सगळ्या मंडळींच्या मनाच्या मोठेपणाचा प्रत्यय वेळोवेळी येत गेला. त्यातील काहींची आर्थिक परिस्थिती उत्तम तर काहींची अगदी साधारण. काहींची घरे लहान तर काहींची मोठी. पण त्या सगळ्यांमध्ये एक गोष्ट समान होती. ती म्हणजे मनाचा मोठेपणा.

आपल्याकडे आलेल्याचे भरभरून अगत्याने स्वागत करणे, त्यांचा प्रेमाने पाहुणचार करणे या त्यांच्या गोष्टी मनाला स्पर्शून गेल्या. त्या सगळ्यात एक प्रकारचा अकृत्रिमपणा होता. उत्स्फूर्तपणे प्रेमपूर्वक केलेले स्वागत आणि औपचारिक स्वागत आपल्याला सहज लक्षात येते.

चि सौ सारिकाच्या घरची सगळीच माणसे अतिशय प्रेमळ आणि धार्मिक. आल्यागेल्याचे मनापासून स्वागत करणारी. सारिकाचे यजमानही तिच्यासारखेच सी ए. सासरे कृषी अधिकारी म्हणून निवृत्त झालेले. दीर उच्चशिक्षित आणि अत्यंत बुद्धिमान. नणंद डॉक्टर. नणंदेचे दीर, यजमान यांनी स्वतःचा उद्योग सुरु करून आजमितीला एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक कमावला आहे. अशा या परिवारात माझी मुलगी सून म्हणून गेली. यथावकाश चि स्वराजचा जन्म झाला. पण लवकरच तिच्यावर एक गंभीर प्रसंग ओढवला. पोटदुखीच्या आजारातून तिला कॅन्सर असल्याचे निष्पन्न झाले. सगळ्यांनाच मोठा धक्का बसला. अशा वेळी तिचे यजमान आणि सासरकडील सगळीच मंडळी तिच्या पाठीशी उभी राहिली. त्यांच्या खंबीर पाठिंब्याने आणि प्रयत्नांनी ती सगळ्या दिव्यातून बाहेर पडली आणि आज ती तिचे सगळे काम नियमितपणे करते आहे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### जीवनात एक उद्देश असणे आवश्यक

आधुनिक केसरी

आनंद ही अशी गोष्ट आहे, जी आपण स्वतःसाठी निवडतो आणि आपल्या अस्तित्वानुसार आपले जीवन जगण्याचा मार्ग देखील आपणच निवडतो. जीवनातील घटनांचा आपण कसा अर्थ लावतो, यासोबतच आपली आंतरिक भावना आनंद निर्माण कशामुळे करते, हे समजून घेणे आवश्यक असते. आनंदाच्या अनेक भिन्न व्याख्या असल्या तरी, त्याचे वर्णन अनेकदा सकारात्मक भावना आणि जीवनातील समाधान म्हणून केले जाते. आपल्याकडे जे काही आहे, त्याबद्दल कृतज्ञ राहणे, वर्तमानावर लक्ष केंद्रित करणे आणि आपल्यावर काहीही आणि कोणतेही संकट आले, तरी सकारात्मक राहणे आवश्यक असते, कारण आपल्याला शेवटी आनंद प्राप्त करण्यात ते मदत करू शकते. आपल्या स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून नातेसंबंधातील प्रत्येक सदस्याच्या बाबतीत आपण ठेवलेला चांगला दृष्टीकोनच निश्चितपणे आनंद देते राहतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कुटुंबात आपापसातील भांडणाचा प्रश्नच उद्भवू दिला नाही आणि केवळ सकारात्मक भावना मनात ठेवली तर सर्वांनाच आनंदाची प्रचीती प्राप्त होऊ शकते. जसे की आनंद, कृतज्ञता, समाधान, प्रेरणा आणि अभिमान हे सर्व जेव्हा आपण अनुभवतो, तेव्हाच त्या चांगल्या वाटत असतात. ह्या सर्व गोष्टी आपल्याला चांगले कार्य करण्यास, आपली धारणा विस्तृत करण्यास, आपली लवचिकता वाढवण्यास आणि आपले शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत करतात. जे नातेसंबंधातील प्रत्येकाचे जीवन आनंदाने जगण्यायोग्य, सजग, सक्षम, समर्थ बनवते, आपल्या प्रत्येकाच्या जीवनात हा एक उद्देश असणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

### हरिनाम घेता | सुखावलो ||

अंतरी नांदतो | त्रैलोक्याचा धनी ||
जन्मभरी ध्यानी | नाही आले ||१||

चंचल मनाला | विकाराची बाधा ||
विषयात सदा | गुंतलासी ||२||

दिव्याखाली तम | गिळिले उजेडा ||
लावूनी झापडा | अंध झाला ||३||

जाणले मी सार | भाव शुद्ध मना ||
अंतरीची वीणा | झंकारली ||४||

उजळला दिप | संतवाणी होता ||
हरिनाम घेता | सुखावलो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**गुणवदगुणवद्वा कुर्वता कार्यजातं**
**परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन।**
**अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेर्**
**भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः ।।**

**अर्थ :** गुणयुक्त आणि दोषयुक्त कर्म करताना विद्वानांनी त्याचे परिणाम योग्यप्रकारे जाणून घ्यावेत. अतिशय त्वरेने केल्या गेलेल्या कर्मांचा परिणाम आजीवन हृदयास शल्याप्रमाणे जाळणारा असतो. कोणतेही कर्म करताना ते सारासार विचार करून केले जावे, असे या श्लोकाद्वारे कविराज भर्तृहरींनी सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### मायोद्भव निरूपण

आधुनिक केसरी

पण आता एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की आता अस्सल तत्व जे निर्गुण ब्रम्ह तेवढे शिल्लक रहाते. आता पहा मित्रांनो! हा मायेचा खेळ कसा आहे ते लक्षपूर्वक एकावे.

समासाच्या आरंभी ब्रम्हाचे वर्णन सांगितले तेच सगळ्या विश्वाला व्यापून राहिले आहे हेही सांगितले, ज्या विश्वाला ब्रम्ह व्यापून असते ते सगळें नाहीसें होते.मग उरते ते निव्वळ ब्रम्ह होय. अहंकारी घमेंडखोर द्रुश्याचा निरास होतो. त्यामधून कायम शाश्वत कोणते व केवळ वरवरचें कोणते याची आपोआप निवड होते. मग आपण खरें कोण याचा बोध आपल्या ठिकाणी आपल्याला घडतो.काल्पनिक मीपणा गेला की जो शुद्ध'मी'उरतो तोच खरा निर्गुण आत्मस्वरूप होय.विनाशी तत्वे विवेकाने नाहीशी केली तर निर्गुण आत्मा तोच मी आहे असा साक्षात्कार होतो. विनाशी तत्वे ओसरल्यानंतर देहाचा मीपणा वेगळेपणाने दाखवणे शक्य नसते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तत्वे आणि मी पणा दोन्ही विनाशी व द्रुष्य असल्याने तत्वांचा निरास झाला की मीपणा संपतो. मग निर्गुण आत्मा तेवढा शिल्लक रहातो. तेव्हा "सोहं म्हणजे मी तोच आहे" अशा आत्मनिवेदनाचा साक्षात अनुभव येतो. एकदा का तुम्हाला हे आत्मनिवेदन घडले म्हणजे"देव व भक्त"एकरूप होऊन जातात."देवरूप होऊ सगळे" याची प्रचिती येते.

निर्गुण रूपाला जन्ममरण नाही, पापपुण्य नाही जो निर्गुण निराकार असतो तो या मायेच्या विळख्यातुन मुक्त होतो. जीव विनाशी तत्वांनी वेढलेला असतो,त्यामुळे तो संशयाच्या चक्रांत अडकतो.स्वतः ला विसरतो आणि"कोहं"म्हणजे मी कोण आहे असे विचारू लागतो. जीव जोपर्यंत तत्वामध्ये गुरफटलेला असतो तोपर्यंत मी कोण आहे असे विचारतो. त्यालाच शंका निर्माण होते तो स्वतः शंकेचे अभ्यासाने निरसन करतो तेंव्हा"मी तोच आहे" असा जीवाला अनुभव येतो अखेर आत्मस्वरूपाशीं एकरूप होऊन "मी तूं पणाचा भेदाचे निरसन झाले की अहं --सोहं हा भेद ऊरत नाही. अशा रितीने सर्व अवस्थांच्या पलीकडे रहाणारा तो "परमात्मा"ओळखावा व त्याच्या आज्ञेनुसार वागावे हेच तर संसाराचे सार आहे.

**समास तिसरा समाप्त**

## आपल्याला सद्गुरुचा आधार वाटावा

आधुनिक केसरी

वेळप्रसंग येईल तसे वागणे उचित आहे, आणि त्याबद्दल मनावर परिणाम होऊ देऊ नये. परमात्म्याच्या चिंतनात मन गुंतले असताना अवांतर गोष्टींचा परिणाम त्यावर होत नाही. जेवढे झेपेल तेवढेच करावे. अभ्यास करावा पण काळजी न करता. सर्वस्वी भार भगवंतावर ठेवून निवांत असावे. आपल्या मनाचे स्वास्थ्य बिघडू न देता आनंदात रहावे. वृत्ती आवरून आवरत नाही; ती परमात्म्याकडे लावली म्हणजे आवरते. रामइच्छेने सर्व चालते असे लक्षात ठेवावे. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले त्या स्थितीत समाधान मानावे.

अंतःकरणात सुप्त असलेले भगवंताचे प्रेम जागृत होण्यासाठी काही निमित्त लागते. तीर्थयात्रा आणि साधुसंतांची भेट हेच ते निमित्त होय. श्रीरामचंद्रही तीर्थयात्रेला जाऊन अनेक संतांची दर्शने घेऊन आले. संतांच्या अहंकाराला जिवंत राहताच येणार नाही. कारण 'परोपकार' करायला लावणार 'पर'च ठिकाणावर नाही, तर मग 'दुसऱ्याकरिता मी काही केले' ही भावना व्हायला



आधारच कुठे राहिला ? विषयाच्या लालसेने सत्समागम करणे हा खरा सत्समागम नव्हे. संत कधीकधी आपल्याला विषय देतात खरे, पण एकंदरीत आपल्याला विषयाचा वीट आणण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो. संताच्या घरी नुसते पडून राहिल्यानेही शुद्ध भाव येईल. भगवंताच्या नामातच संतसंगती आहे, कारण नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय, आणि नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय. तपश्चर्येचे सर्वांत शेवटचे फळ काही असेल तर परमेश्वराच्या ठिकाणी अनन्यभावाने शरण जाण्याची बुद्धी होय. ती बुद्धी आपल्याला झाली पाहिजे. एकदा शरण गेल्यावर आपण उरूच शकत नाही; त्यालाच शरणागती म्हणतात; आणि हीच परमार्थातली अत्यंत श्रेष्ठ गती आहे. आपण आपल्या सद्गुरूचे आहोत असे छातीठोकपणे सांगत चला. काही नाही केलेत तरी चालेल, पण आपले सद्गुरू आपल्या मागेपुढे आहेत अशी दृढ भावना असावी. मला सुखदुःख दोन्ही नाहीत. पण तुम्ही दुःखी झालात तर मला दुःख होते. तेव्हा तुम्ही मनाला दुःखच होऊ नये असे वागा. प्रपंची माणसाच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे. ती जाणीव ठेवूनच 'भगवंताचे नाम घ्या' असे मी सांगतो. जे मी सुरुवातीला सांगितले तेच शेवटी सांगतो; तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका.

**आजचे बोधवचन :** तुम्ही नुसते नाम घ्या, बाकीचे सर्व मी करतो.

**-श्री सद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## भेटी लागी जीवा... भाग : 3



# वारी म्हणजे अद्वैत विद्वत्तेचे माहेर

आधुनिक केसरी

**'मुखी नाम गर्जे वाणी म्हणे नाम्याची जणी...'**

पंढरपूरला जाणारा प्रत्येक वारकरी मुखाने जय जय राम कृष्ण हरी..., ज्ञानोबा- तुकाराम यांचा गजर करीत आनंदाने तो विठ्ठलाच्या भेटीसाठी जातो. निष्काम भावनेतून झालेल्या कर्माने अंतकरण शुद्ध होते.



ह.भ.प. अर्जुन होलिया

मनातील द्वंद्व, द्वेष, भावना दुर होऊन प्रेम ,एकता, आनंद या वारीतून प्रत्येकाला मिळत असतो. वारी म्हणजे चिंता दूर करण्याचे एक शास्त्रच आहे. या शास्त्राचे सूत्र अजून कोणालाही सापडले नाही. आनंद, चैतन्य, आणि श्रेयसाचे विलोभनीय दर्शन या वारीतून होत असते.

म्हणून सातशे वर्षाचा इतिहास पूर्ण झालेले अखंड विश्वातील हे एक आगळे वेगळे, न भूतो न भविष्यती अशा प्रकारचे वारी हे अद्वैत असे विद्वत्तेचे माहेर आहे.

संतांनी भागवत धर्माची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी एकत्र भेटण्यासाठी ठिकाण, वेळ, निश्चित केले ते म्हणजे पंढरपूर. पंढरपूर म्हणजे तहान भूक हरवलेले एक मनामनात रुजलेले तीर्थक्षेत्र आहे.

**'धन्य पंढरीची वारी**
**सदा वसे जया घरी,**
**तोची देवाचा आवडता**
**कळीकाळा मारी लाथा..'**

संसार दुःखात पडलेल्या जीवाला, मनुष्याला आनंद पाहिजे तो आनंद, ते सुख पंढरपुरात पदोपदी मिळत असते. कारण तिथला देव उभा आहे. तो भक्तांच्या भेटीसाठी आसुसलेला आहे. त्याचे चैतन्य मनामनात रूंजी घालत असते. वारी हा प्रत्येक वारकऱ्यांसाठी त्यांच्या श्रद्धेचा भाग आहे. तो तितकाच सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. ही वारी म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीची, वैविध्यतेची आणि सकल जणांची अद्वैत अशी ओळख आहे. वारीतून माणसाने माणसासाठी जोडले जावे हा एक पक्का धागा दिसून येतो. म्हणून संतांनी आम्हाला विश्वाचे ही एक प्रकारे दिलेले दान आहे. त्या मुळाशी जात, त्याचा शोध घेऊन तो मिळवणे म्हणजे आपली प्रगल्भता आहे असे मी म्हणेन. पंढरीची वारी अथांग श्रद्धेचे, आमच्या प्रेमाचे, साध्य आणि साधनेचे एक भक्कम व्यासपीठ आहे. त्यातले नामस्मरण आम्हाला कितीतरी आनंद देणारे आहे. त्यामुळे वारीतला अनुभव मनाशी कायम खूणगाठ बांधून असतो. आणि ही ताकद वारीतल्या श्रद्धेतून मिळत असते.

**'पंढरीची वारी आहे ज्याच्या घरी,**
**तोचि अधिकारी धन्य जगी..'**

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद**

# कृषितंत्रज्ञानाच्या साहाय्याने देशाला समृद्धीकडे नेऊ : राज्यपाल

## मिळालेल्या ज्ञानाचा वापर समाजाच्या विकासासाठी करा : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे उद्देश ओळखावे. आदर्श नागरिक बनण्याचे संस्कार घेऊन विद्यापीठातून बाहेर पडावे, जेणे करुन आपण सर्व मिळून कृषितंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांच्या आयुष्यात बदल घडवू आणि देशाला समृद्धीकडे नेऊ शकू,अशा शब्दात राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी आज डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात स्नातकांना मार्गदर्शन केले. 'डॉक्टर ऑफ सायन्स', या मानद पदवीने सन्मानित केंद्रीय रस्ते वाहतुक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनीही यावेळी उपस्थित पदवीधरांना, नव्या शेती तंत्रज्ञान आणि उद्योगाच्या प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी योग्य ध्येय्यदृष्टी असलेले योग्य नेतृत्व व्हा, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या.

येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ३६ वा दीक्षांत समारंभ आज येथे पार पडला. या सोहळ्यासाठी राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी, केंद्रीय रस्ते वाहतुक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी, पंडीत दीनदयाल उपाध्याय पशुचिकित्सा विज्ञान विश्वविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे माजी कुलगुरु डॉ. एम. एल. मदान, कुलगुरु डॉ. विलास भाले, कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे, विधान परिषद सदस्य आ. अमोल मिटकरी, आ. वसंत खंडेलवाल, विधानसभा सदस्य आ. रणधीर सावरकर, अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीना, जिल्हाधिकारी निमा अरोरा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ कटीयार, मनपा आयुक्त कविता द्विवेदी, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर तसेच सर्व प्राध्यापक, विविध क्षेत्रातील मान्यवर व स्नातक उपस्थित होते. या पदवीदानात विद्यापीठातर्फे ३६४६ विद्यार्थ्यांना (स्नातक, स्नातकोत्तर व आचार्य) विविध पदव्या देण्यात आल्या. या



समारंभात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदवीने सन्मानित करण्यात आले.

राज्यपाल कोश्यारी म्हणाले की, जिवनाचे ध्येय्य ठरवून आदर्श नागरिक होण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा. नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार करुन आपण शेतकऱ्यांपर्यंत ते पोहोचवावे. प्रत्येक शेतकऱ्याच्या जीवनात आपण सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यासाठी आपण सारे मिळून प्रयत्न करु या, असे आवाहन श्री. कोश्यारी यांनी केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मानद पदवी बद्दल विद्यापीठ व कार्यकारी समितीचे आभार व्यक्त केले. आपल्या भाषणात श्री. गडकरी यांनी सांगितले की, कोणताही पदार्थ आणि व्यक्ती ही निरुपयोगी असत नाही. त्याचा वापर कसा करावा याचे ज्ञान आपल्यापाशी असणे आवश्यक आहे. मिळालेल्या ज्ञानाचा वापर समाजाच्या विकासासाठी करण्याचे उद्दिष्ट आपले असले पाहिजे. विदर्भाची पिकस्थिती ध्यानात घेऊन त्याविषयी संशोधन करणे आवश्यक आहे. आपण सर्व संशोधकांनी यादृष्टिने संशोधन करावे, जेणे करुन शेतकऱ्यांचा विकास झाला पाहिजे. सकल घरेलू उत्पादनात योगदान कमी मात्र शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या अधिक अशी परिस्थिती आहे, ही परिस्थिती बदलण्यासाठी शेतीवर आधारीत उद्योगात गुंतवणूक व त्यापासून मिळणारे उत्पादन वाढवायला हवे. त्यासाठी ग्रीन हायड्रोजन, बायो डीजल यासारख्या उत्पादनांकडे शेतकऱ्यांनी वळावे, आणि शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता न होता उर्जादाता ही व्हावे, असे आवाहन श्री. गडकरी यांनी केले.

विदर्भात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविणे हे माझ्या जीवनाचे मिशन आहे. त्यासाठी शेतीतून अधिकाधिक उत्पादन कसे मिळेल यासाठी मी स्वतः प्रयोग करीत असतो. विद्यापीठानेही याच क्षेत्रात योगदान द्यावे. शिकून तयार झालेल्या युवकांनी नोकरी देणारे व्हावे. कृषी क्षेत्राशी निगडीत नवतंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवा आणि कृषी आधारीत उद्योग निर्माण करा,असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलगुरु डॉ. विलास भाले यांनी विद्यापीठाचे अहवाल वाचन केले. त्यानंतर पदवीदान सोहळा झाला. प्रमुख अतिथी असलेले डॉ. मदान यांनीही आपले मार्गदर्शन केले. कुलपतींनी हा सोहळा समाप्त होत असल्याची घोषणा केल्यानंतर पसायदान व राष्ट्रगिताने समारंभाची सांगता झाली.

# भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोशने केले उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महापालिकेत विविध विभागात काम करणाऱ्या असंघटीत मजुरांची आर्थिक शोषण थांबवून कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडविण्यात याव्या यासाठी भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोशच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषण केले.

मनपात काम करणाऱ्या मजुरांना २६० ते ३०० रूपये इतका पगार देवून पीएफ न भरता, विम्याची रक्कम न भरता आर्थिक शोषण केले जात आहे. मजुरांची शोषण करणारा ठेकेदाराची चौकशी करून कारवाई करण्यात यावी, कंत्राटी मजूर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराचा मनुष्यबळ पुरविण्याचा शासकीय परवाना करार पत्र ईपीएफ रजिस्ट्रेशन, विमा प्रमाणपत्र, पगार स्लिप याबाबतची माहिती मनपाच्या संकेतस्थळावरून नागरिकांना उपलब्ध करून देणे तसेच कंत्राटी मजूरांचे शोषण थांबवावे अशी मागणी भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशचे भाऊसाहेब कांबळे यांनी दि. १० डिसेंबर २०२१ रोजी शासनाकडे आधीच केली आहे. या उपोषणाप्रसंगी खान्देश अध्यक्ष भिमराव बडगुजर व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# हॉटेल मालकाने मृतकाच्या परिवारास ७ लाख रुपये देण्याचे केले मान्य : मोतीलाल चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाल येथील घाटे दुग्ध मंदिर येथे काम करणाऱ्या कामगाराचा चहा बनविणाऱ्या मशीनच्या विद्युत धक्क्याने युवकाचा मृत्यू झाला होता. या घटनेची गंभीरतेने दखल घेत पोलिस उपायुक्त गजानन राजमाने यांच्या मदतीने मृतकाचा परिवार आणि घाटे हॉटेलचे संचालक यांच्यात समझोत होऊन हॉटेल मालकाने मृतकाच्या परिवारास ७ लाख रुपये देण्याचे मान्य केले.

भंडारा जिल्ह्यातील रोहन रामप्रसाद ठाकरे हा नागपूरला काम करण्यासाठी आला होता. तो महाल येथील दुग्धमंदिर भंडार येथील हॉटेलमध्ये काम करीत होता. चहा करताना त्याला इलेक्ट्रिक मशीनचा धक्का लागून त्याचा मृत्यू झाला. तो आई वडिलांना एकुलता एक असल्याने संपूर्ण कुटूंबाचा भार त्याच्यावर होता. एकुलता एक मुलगा गेल्याने आई वडिल हताश झाले होते. या प्रकरणाची पोलिस उपायुक्त गजाजन राजमाने यांनी गंभीर दखल घेत सामाजिक संघटना, मृतकाचा परिवार आणि हॉटेलचे संचालक यांच्या पोलिस उपायुक्तांनी समझोता करुन देत हॉटेल मालकाने मृतकाच्या परिवाराला ७ लाख रुपये देण्याचे मान्य केले.




यावेळी सामाजिक कार्यकर्ता यशवंत गुड्डू रहांगडाले, सुनील खेरडे, पृथ्वीराज रहांगडाले, मोतीलाल चौधरी, विजय पटले, सुनील बिसेन, प्रमोद पटले, मानिक पारधी, हिरदिलाल ठाकरे, दिनेश मेश्राम, गणेश ढोबले, भुमेश्वर हनवत, पुनाराम गौतम, अभिमन्यु ठाकरे, अनिल ठाकरे, प्रकाश बैगने, किशोर रहांगडाले, राजेंद्र पारधी, प्रेम बोपचे, बंडू पटले, लकी चौधरी, महेश ठाकरे, रमेश चौधरी, निलेश बोपचे, सचिन बिसेन, खुमेश भगत यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# कागदपत्रांच्या संपूर्ण पडताळणीनंतरच राज्य उत्पादन विभागाकडून 'त्या' दारु दुकानांच्या प्रस्तावांना मंजुरी

## नागरिकांना काही आक्षेप असल्यास पुराव्यासह संपर्क करण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र शासन आदेशानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविण्यात आली होती. त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त यांच्या 11 जून 2021 च्या पत्रानुसार, चंद्रपूर जिल्हा दारुबंदी होण्यापूर्वी म्हणजे 31 मार्च 2015 रोजी, ज्या जागेत अबकारी अनुज्ञप्ती कार्यरत होती, त्या जागेवरच अनुज्ञप्ती सुरू करून देण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. या आधारावर दारुबंदीपूर्वी जिल्ह्यात 561 एवढ्या अनुज्ञप्त्या कार्यरत होत्या, त्यापैकी 395 अनुज्ञप्त्यांचे व्यवहार शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य उत्पादन विभागाकडून सुरू करून देण्यात आले.

नवीन परमीट रुम (एफएल-३) परवानगी देण्यासंदर्भात जिल्हास्तरीय समिती कार्यरत असून यात अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी, सदस्य म्हणून जिल्हा पोलिस अधिक्षक, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी तर सदस्य सचिव म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक आहे. आलेल्या प्रस्तावांची / कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच नवीन परमीट रुमला मंजूरी प्रदान करण्यात आल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक संजय पाटील यांनी स्पष्ट केले आहे. जिल्हास्तरीय समितीपुढे नवीन परमीट रुम संदर्भात प्रस्ताव ठेवण्यापूर्वी, राज्य उत्पादन शुल्क विभागात प्राप्त झालेल्या अर्जावर आवश्यक चौकशी अहवाल प्राप्त करून घेऊन सदर प्रस्तावित केलेली जागा योग्य व अंतरनिर्बंधमुक्त असणे तसेच अर्जदाराने प्रस्तावित केलेल्या जागेबाबत पोलिस विभागाकडील कायदा व सुव्यवस्थेचा अहवाल अनुकुल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरण जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत ठेवण्यात येतात. सदर बैठकीत प्रकरणानिहाय चर्चा, अर्जदाराचा अर्ज मंजूर किंवा नामंजूर करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येतो. प्राप्त झालेल्या अर्जावर शासन अधिसुचनेतील निर्देशानुसार 60 दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दारुबंदी उठविल्यानंतर म्हणजे जवळपास एक वर्षानंतर 7 जून 2022 रोजी जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. वर्षभरात आलेल्या प्रस्तावांवर या बैठकीत चर्चा होऊन संपूर्ण कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर परिपूर्ण असलेल्या प्रकरणास मंजुरी प्रदान करण्यात आल्याचे संजय पाटील यांनी सांगितले.

**सर्व परवाने नियमानुसारच : जिल्हाधिकारी अजय गुल्हाने**

जिल्ह्यात दारुबंदी उठविल्यानंतर देण्यात आलेले सर्व परवाने हे नियमानुसारच आहे. जिल्हास्तरीय समितीमध्ये प्रकरणे मंजूर करतांना शासन निकषानुसार मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात आल्यानंतरच प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे. नागरिकांना जागेबाबत किंवा इतर काही कागदपत्रांबाबत आक्षेप असल्यास योग्य त्या कागदपत्र पुराव्यांसह निवेदन किंवा तक्रार सादर करावी. त्यावर नियमानुसार उचित कार्यवाही केली जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.



# वादग्रस्त पोस्टर

आधुनिक केसरी

लीना मणिमेकलाई यांच्या काली या माहितीपटाबाबत सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या माहितीपटाच्या पोस्टरवरुन धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करण्यात येत असून लीना यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्याचवेळी, लीना यांच्या काली या माहितीपटाची कथा काय आहे आणि पोस्टरद्वारे काय दाखवण्याचा प्रयत्न करत आहे, अशी चर्चा सर्वांमध्ये सुरू आहे. एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात सिगारेट घेऊन उभ्या असलेल्या कालीमातेचा फोटो सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आले आहे. दिग्दर्शक लीना मनिमेकलाई यांच्या ‘काली’ या माहितीपटाचे हे पोस्टर आहे, ज्यावर लोक प्रचंड संतापलेले दिसत आहेत. ‘काली’ या माहितीपटाच्या पोस्टरवरून वाद सुरूच आहे. दरम्यान, चित्रपटाच्या कथेबाबतही अनेक चर्चा सुरु आहेत. या माहितीपटाच्या पोस्टरमध्ये लीना यांना काय संदेश द्यायचा आहे याबाबत त्यांनी एका मुलाखतीमध्ये भाष्य केले आहे. मणिमेकलाई यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी या चित्रपटात कालीमातेला मानवाच्या रूपात दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. बीबीसी तमिळला दिलेल्या मुलाखतीत लीना मनिमेकलाई म्हणाल्या होत्या की, मी म्हणेन की काली ही एक महत्त्वाकांक्षी व्यक्ती आहे जी राक्षसी प्रवृत्ती आणि वाईटाच्या सर्व टोकांना पायदळी तुडवते. हा माहितीपट अशीच एक व्यक्ती माझ्यात सामावली आणि त्यावेळी मी टोरंटोच्या रस्त्यावर फिरताना काय होईल हे दाखवतो. ज्या कॅनेडियन लोकांकडे घर नाही, जे गरीब कामगार वर्ग आहेत, जे उद्यानात झोपतात, त्यांच्याकडे फक्त एक सिगारेट आहे जी त्यांच्या मनोरंजनासाठी वापरली जाते. काली ती प्रेमाने स्वीकारते. कवयित्री, डॉक्युमेंटरी फिल्ममेकर आणि निर्मात्या म्हणून स्वतःला सिद्ध करणाऱ्या लीना यांनी असे अनेक चित्रपट बनवले आहेत ज्यात लैंगिक आणि सामाजिक अत्याचार उघडपणे दाखवण्यात आले आहेत. मादाथी आणि रेड सी या लीना यांच्या चित्रपटांमुळे त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. यासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आले आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, लीना यांच्या चित्रपटांमध्ये अनेकदा कोणत्या ना कोणत्या प्रकारे भारतीय महिलांचे चित्रण समाविष्ट असते. टोरंटो येथील आगा खान संग्रहालयात ‘अंडर द टेंट’ प्रकल्पाचा एक भाग म्हणून मनिमेकलाई यांचा माहितीपट काली प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाच्या पोस्टरवरून वाद निर्माण झाल्यानंतर, कॅनडातील हिंदू समुदायाच्या नेत्यांकडून माहितीपटाबद्दल तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ओटावा येथील भारतीय उच्चायुक्ताने कॅनडाच्या अधिकाऱ्यांना त्याच्याशी संबंधित सर्व प्रक्षोभक सामग्री काढून टाकण्याची विनंती केली.

# शिवसेनेची वाताहत : बाळासाहेब उद्विग्न

आधुनिक केसरी

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आडमुठ्या, अहंकारी आणि सर्वंकष विनाषी भुमिकेमुळे आता खासदारांमध्येही दुफळी. वाशिमच्या शिवसेना खासदार भावना गवळी, सुर्वे या लोकसभेत शिवसेनेच्या मुख्य प्रतोद होत्या. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या उठावा नंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना एक पत्र लिहिले की या उठाव केलेल्या आमदारांचे म्हणने एकदा ऐकुण घ्या. काल त्यांची प्रतोद पदावरुन हकालपट्टी झाली. आणि ठाण्याच्या राजन विचारेंची प्रतोद म्हणून नेमणूक केली. एकनाथ शिंदे ही ठाण्याचेच आहेत. त्यामुळे राजन विचारे पक्षच घेऊन शिंदे गटाला नाही मिळाले म्हणजे मिळवली.**




राहूल शेवाळे या मुंबई च्या खासदाराने, ज्यांच्या मतदार संघात सेना भवन आहे, यांनी उध्दव ठाकरेंना पत्र लिहून मागणी केली की राष्ट्रपती पदाचे निवडणुकीत द्रौपदी मूर्मू यांनाच मते देण्याचा आदेश काढावा. त्यांनी पूर्वीची, प्रतिभाताई पाटील, शेखावत आणि प्रणबदा मुखर्जी यांना शिवसेनेने पाठिंबा दिला होता, याची आठवण पण करून दिली आहे. आणि आम्ही यशवंत सिन्हा यांना मते देणार नाहीत असेही सुनावले आहे. तरीही अहंकारी, अडमुठ पक्षप्रमुख म्हणत आहेत काय वाट्टेल ते झाले तरी मी भाजपला सहकार्य करणारच नाही. म्हणजे आता तत्वासाठीच या खासदारांना उठाव करावाच लागेल. पक्षविरोधी संघटीत निर्णय घ्यावाच लागेल. परत निलंबनाचा विषय ऐरणीवर येणार.

आज सात तारीख आहे. अठरा तारखेला राष्ट्रपती पदाची निवडणूक आहे. म्हणून खासदारांना दोन दिवसात निर्णय घेऊन वाटचाल करावी लागेल. अठरा पैकी चवदा खासदार वेगळा गट करणार, आपला प्रतोद आणि गटनेता निवडणार आणि व्हीप काढणार की द्रौपदी मूर्मू यांनाच मते द्या. राज्यसभेतील ही संजय राऊत वगळता शिल्लक दोन तीन खासदारही हीच भूमिका घेणार. द्रौपदी मूर्मू यांना मिळत असलेला वाढता पाठिंबा पाहता रामनाथ कोविंद पेक्षाही जास्त मते घेऊन मूर्मू विजयी होतील. असे वाटते आहे. कारण द्रौपदी मूर्मू या ओरिसा राज्यातील असल्याने बिजू जनता दलाने त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. जगमोहन रेड्डी यांनी ही आंध्र प्रदेश मधून पाठिंबा जाहीर केला आहे.

नितीशकुमारनी ही तेच केले आहे. आता फक्त लालूंचा राजद आणि स्टॅलिन चा द्रमुक हे त्यातल्या त्यात मोठे विरोधीपक्ष आहेत. आणि तेलंगणाचे केसीआर. त्यामुळे उध्दव ठाकरे यांनी आजूनही वेळ गेलेली नाही समजून घेऊन जुळवून घ्यावे. नाहीतर हार / पराभव मान्य करून पक्ष विसर्जित करावा. जर अजूनही शिवसेना उभी करण्याची उमेद असेल तर कांही हरकत नाही. परंतू एकदा एकनाथ शिंदे ग्रुपच खरी शिवसेना आहे असा निर्णय झाला तर मग हाती काहीच राहणार नाही. मग आठ मजली नवीन मातोश्री च्या बांधकामाची चौकशी सुरू होईल. सोर्स विचारला जाईल. इन्कम टॅक्स रिटर्न (आयटीआर) आणि बांधकाम खर्च यांचा मेळ बसवून द्यायला सांगितले जाईल. उत्पन्नाचे स्त्रोत उघड करताना तारांबळ उडेल. त्यामुळे थोडे लवचिक धोरण स्विकारून दोन पावले मागे येऊन कालांतराने झेप घेता येईल काय याची चाचपणी करावी. एकदा का खासदार फुटले तर मात्र हाती धूपाटणेच येणार आहे. ईगो बाजूला ठेऊन, राजकारण हाच मुख्य व्यवसाय म्हणून स्विकारलेला असेल तर ॲडजेस्ट व्हावेच लागेल. अन्यथा बाळासाहेब ठाकरे यांनी सोपविलेली विरासत खालसा झालीच समजा. साहेब गालातल्या गालात हसत आहेत.

आकाशाकडे पाहून बाळासाहेबांना हिणवत आहेत. कशी जिरवली म्हणत उचकावत आहेत. लाजेने चूर झालेले बाळासाहेब हतबल, हताश होऊन आपल्याच सूपुत्राची वासलात झालेली असहायपणे पाहात आहेत. खासदार फुटले तर त्यांना दोषही देता येणार नाही. कारण भावना गवळी सुर्वे वर कारवाई करून सुरूवात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच केली आहे. राहूल शेवाळेच्या पत्राकडेही दुर्लक्ष केले तर कांही खरे नाही. महाराष्ट्रात जेंव्हा केंव्हा निवडणूक होईल, म्हणजे 2024 मध्ये अथवा साहेबांचे होऱ्या प्रमाणे मध्यावधी निवडणूक झालीच तर युती विरूध्द आघाडी असा सामना होताना उध्दव ठाकरे यांची शिवसेना स्वतंत्र लढणार आहे काय? कारण आजच्या आहे त्या परिस्थितीत निवडणूक जाहीर झाली तर साहेब शिवसेनेला (उध्दव ठाकरेंच्या) किती जागांची भिक घालतील हे पाहावे लागेल. शिवसेना विरूध्द शिवसेना अशा लढती झाल्या तर परिस्थिती खुपच अवघड होऊन जाईल.

**पीपीएम, पुणे**



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# जीवनातील शांतीचा संबंध हा शुद्ध चित्ताशी असतो...!

आधुनिक केसरी

**मनुष्य हा विद्वान प्राणी, जेवढा बुद्धिमान, शक्तिशाली, बलाढ्य, तेवढाच अशांत सुद्धा असतो. पृथ्वीवरील अंनत अशा नानाविध संपदा सुविधा मिळाव्यात म्हणून रात्रंदिवस प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतो. अनेकदा ब-याच गोष्टी मिळतात काही सुटतात, तर काही मिळाल्यानंतर हातातुन निसटतात. असा हा निश्चित अनिश्चिततेचा खेळ असतो. यामध्ये मन शांती ही चिरस्थायी व सगळ्यात सुलभ बाब आहे.**

परंतु प्रत्येक मनुष्य याच चिरस्थायी आणि सगळ्यात सुलभ बाब असणार-या मनःशांती पासुन कित्येक कोस दूर आहे. तिथपर्यंत पोहचण्यासाठी मनुष्य प्रयत्न जरी करत असला तरी जे मुख्य प्रयत्न आवश्यक आहेत. ते न करता दुसरेच प्रयत्न करत असल्याने ही मनःशांती बाह्य अशा भौतिक जगामध्ये मिळणं दुर्लभ आहे.

आपल्या जीवनात चिरशांती नको असा कोणी ही शोधून सापडणार नाही. शांतीसाठी मनुष्य जग भ्रमण करतो. कुठलाही उपाय पर्याय मनुष्य शिल्लक सोडत नाही. परंतु वास्तविक सत्य हे आहे की शांती ही बाह्य जगात सापडणारी किंवा कुठल्याही मुल्यावर विकत मिळणारी बाब नाही. तर ती आपल्या चित्ता मधील आंतरीक प्रकिया आहे. शांती ही आपल्या अंतःकरणात असते म्हणून जर चित्त अशुद्ध असेल तर कुठल्याही किंमतीवर शांती मिळणार नाही. आणि जर आपल चित्त हे शुद्ध असेल तर कुठल्याही अटी-शर्ती शिवाय अगदी सहजासहजी निःशुल्क मन शांती आपल्याला मिळेल यामध्ये शंका नाही.

म्हणजेच शांती ही आपल्या चित्ता मध्ये निर्माण होणारा जो भाव आहे त्यावर अवलंबून असते. आपल्या मनात शुद्ध चित्ताने सदभावना, सदभाव निर्माण झाले तर मन शांती मिळेलच. मात्र अशुद्ध चित्त ठेवून दुर्भावना निर्माण झाली तर कितीही प्रयत्न केले तरी मनःशांती मिळु शकत नाही. शुद्ध चित्त आणि सदभावना ठेवणं हेच सध्याच्या विद्यमान युगातील सगळ्यात मोठी अडचण आहे, समस्या आहे. तसेच खुप मोठं आव्हान आहे. तर मग शुद्ध चित्त कसं ठेवणार आणि मनःशांती कशी मिळणार....? तर हे फार काही अवघड अस कार्य नाही. यासाठी आपल्या मनात आणि जीवनात सात्विक वृत्ती निर्माण झाली की आपोआप हे सगळं जग विष्णूमय दिसत. आणि आणि भौतिक मोह माया, लाभ-नफा, मित्र-शत्रु एकसमान दिसतात. वाईट काहीच दिसत नाही.आणि एकदा वृत्ती शुद्ध झाली की आपोआप चित्त शुद्ध होत आणि मन शांती मिळते. यासाठी आध्यत्मिक ज्ञान हे सगळ्यात प्रभावी माध्यम आहे. या मार्गावर पोहचण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. तेंव्हा एवढेच की जीवनात शुद्ध चित्त-अंतकरणास अनन्यसाधारण महत्त्व आहे.....!!.

**(संस्थापक वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य तथा वंजारी समाज ईतिहास अभ्यासक व लेखक बालसंस्कार शिबिर अध्यात्मिक मार्गदर्शक)**



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सांस्कृतिक केंद्र व विद्येच्या माहेरघरातील लैंगिक अत्याचाराचा पाढा



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**पुणे हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक महत्त्वाचे शहर आहे. उद्योग, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीमुळे पुणे हे राज्यात मुंबई नंतर दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. एके काळी मराठ्यांचे साम्राज्य असलेले पुणे हे समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा लाभल्यामुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. देशातील अनेक नामांकित शैक्षणिक संस्था पुण्यात असून जगभरातील अनेक विद्यार्थी त्यांत शिक्षण घेत आहेत. त्यामुळेच पूर्वेकडील ऑक्सफर्ड किंवा विद्येचे माहेरघर म्हणूनही पुण्याची ओळख आहे. आज, पुण्यामध्ये जगातील नामांकित आई.टी. कंपन्याही आहेत; त्यामुळे या शहराला आई.टी. हब म्हणूनही ओळखले जाते. पुणे हे बुद्धिजीवींचे शहर आहे. पुण्यात वर्षभर संगीत, कला, साहित्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. 'पुणे तेथे काय उणे' अशी उक्तीही प्रसिद्ध आहे. मनमोहक हिरवेगार डोंगर, दऱ्या, जंगल, नद्या यांनी पुणे जिल्हा नटलेला आहे. येथे आधुनिकीकरणासोबतच निसर्गाचा समतोलही साधला आहे.**

अशा विविधतेने नटलेली एज्युकेटेड नगरी पुणे नेहमीच चर्चेत असते. जसा विविधांगी छटांनी पुण्याचा इतिहास आपल्यासमोर उभा ठाकतो. अगदी तसाच दृष्कृत्यांच्याही बाबतीत तो नेहमी अग्रेसर हेऊन जगाला आपले दर्शन घडवितो. अशा या सांस्कृतिक केंद्र व विद्येच्या माहेरघरातील मागिल ५ महिन्यातील लैंगिक अत्याचाराचा हा पाढा आपल्यासमोर कथीत...

पुण्यात एका 11 वर्षीय मुलीवर बाप, भाऊ, आजोबा आणि चुलत मामाकडून लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली. ताडीवाला रोड येथे ही मुलगी राहते. महत्वाची बाब म्हणजे मागील ५ वर्षापासून हा प्रकार सुरु असल्याचं समोर आलं. पीडित मुलीने तिच्या शाळेत आयोजित 'गुड टच, बॅड टच' या सत्रात या धक्कादायक अत्याचाराबाबत सांगितले. पीडित मुलीने तिच्या समुपदेशकांजवळ सर्व प्रकार सांगितला. नंतर समुपदेशकांच्या तक्रारीवरून बंडगार्डन पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी आणि तिचे कुटुंबीय मूळचे बिहारचे रहिवासी असून ते सध्या पुण्यात वास्तव्याला आहेत. पीडितेवर मागील पाच वर्षेपासून बलात्कार, विनयभंग. पीडित अल्पवयीन मुलीवर तिच्या किशोरवयीन भावाने आणि बापाने वेगवेगळ्या वेळी बलात्कार केल्याचा आरोप करण्यात आला आहे, तर मुलीचे आजोबा आणि मामाने तिचा विनयभंग केला. संबंधित आरोपींविरुद्ध बलात्कार आणि विनयभंग केल्याप्रकरणी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र कोणालाही अटक करण्यात आले नव्हते. पीडित मुलीला बिहारमध्ये राहत असताना सन २०१७ पासून लैंगिक अत्याचार सहन करावा लागल्याचे एफआयआरमध्ये म्हटले होते. वेगवेगळ्या वेळी घटना घडल्याने सामूहिक बलात्काराचा गुन्हा नाही.

पीडित मुलीने तिच्या शाळेत आयोजित करण्यात आलेल्या 'गुड टच आणि बॅड टच' सत्रादरम्यान स्वतःवरील लैंगिक अत्याचाराबाबत तोंड उघडले. २०१७ मध्ये पीडित मुलीच्या बापाने तिचा लैंगिक छळ सुरू केला होता. त्यानंतर मुलीच्या मोठ्या भावाने नोव्हेंबर २०२० च्या सुमारास तिचा लैंगिक छळ सुरू केला. तसेच मुलीच्या आजोबा आणि मामाने तिला अयोग्यरित्या स्पर्श करून विनयभंग केला. सर्व घटना वेगवेगळ्या वेळी घडल्या. तसेच आरोपींना एकमेकांच्या गैरकृत्यांची माहिती नसल्याने हे सामूहिक बलात्काराचे प्रकरण नाही. या प्रकरणात पोक्सो कायद्याची कलमेदेखील जोडली जातील, असे पोलीसांनी स्पष्ट केले. पीडित मुलीचे आईवडील मूकबधिर आहेत. पीडित मुलगी पुण्यातील एका नामांकित कॉन्व्हेंट शाळेत शिक्षण घेते. पुण्याव्यतिरिक्त बिहारमधील तिच्या मूळ गावीही मुलीचे लैंगिक शोषण झाले होते. त्यामुळे पोलिसांची एक टीम लवकरच बिहारमध्येही जाऊन अधिक तपास करणार होते.

पुण्यातल्या हिंजवडीत अकरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर वडिलांनी लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. गंभीर बाब म्हणजे आरोपी वडिलाने दोन वेळेस मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचं स्पष्ट झालं. ३५ वर्षीय आरोपी वडील, पीडित ११ वर्षीय मुलगी आणि मुलगा असे तिघे जण एकत्र राहात होते. आरोपीचे पत्नीसोबत पटत नसल्याने पत्नी तीन वर्षांपासून वेगळी राहते. मुलं मात्र वडिलांसोबत हिंजवडी परिसरात राहत होते. दरम्यान, १३ मार्च ला पहिल्यांदा सकाळी अल्पवयीन मुलीवर वडिलांनी जबरदस्ती करत लैंगिक अत्याचार केले, तर दुस-या दिवशी देखील म्हणजे १४ मार्चला पुन्हा तिच्या एकटेपणाचा फायदा घेत अत्याचार केले. या घटनेमुळे पीडित मुलगी घाबरली होती. मात्र, मन मोकळं करण्यास तिच्या सोबतीला कुणीच नव्हतं. दरम्यान, धुळवड आणि होळी आल्याने पीडित मुलगी आणि मुलगा यांना आरोपीने आजीकडे गावी सोडले. होळी आणि धुळवड झाली तरी पीडित मुलगी घरी जायचं नाव घेत नव्हती. आजीने पीडित नातीला काही झालं आहे का? असे विचारले असता वडील घाणेरडे वागत असल्याचं तिने आजीला सांगितले. या प्रकरणी सख्ख्या मुलाच्या विरोधात आईने हिंजवडी पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार, ३५ वर्षीय नराधमाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

पुण्यातील एका प्रतिष्ठित शाळेत एका अनोळखी व्यक्तीने ११ वर्षांच्या मुलीवर शाळेच्या स्वच्छ्तागृहात बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. ही घटना सकाळी अकरा ते साडेअकरा या दरम्यान घडली. येरवडा येथील शाळेत शिरून एकतर्फी प्रेमातून दहावीतील मुलीवर खुनी हल्ला करण्याची घटना ताजी असतानाच हा प्रकार समोर आल्यामुळे खळबळ उडाली. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार यांची ११ वर्षांची मुलगी जंगली महाराज रस्त्यावरील शाळेत शिकायला होती. २३ मार्च ला सकाळी ती शाळेत गेली. त्यावेळी एक अनोळखी व्यक्ती शाळेत आली. त्याने तक्रारदार यांच्या मुलीची ओळख असल्याचा बहाणा करून तिला ढकलत ढकलत शाळेच्या स्वच्छ्तागृहात नेले. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. "कोणाला काही सांगितले तर बघ," अशी धमकी देऊन तेथून निघून गेला. या घटनेनंतर घाबरलेल्या मुलीने तिच्या मैत्रिणीला हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी शाळेतील शिक्षिकांना याची माहिती दिली. त्यांनी तातडीने मुलीच्या आईला आणि पोलिसांना शाळेत बोलावून घेऊन घडलेला प्रकार सांगितला. दरम्यान, या प्रकाराची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळेत धाव घेतली. "शाळेत सीसीटीव्ही आहेत. त्याचा तपास केला जात आहे. शाळेत कार्यरत असलेल्या कोणा पुरुषाचे हे काम नाही ना, याची तपासणी आम्ही केली आहे. हा आरोपी बाहेरचा असल्याचे आतापर्यंतच्या तपासात दिसून आल्याचं पोलिसांनी स्पष्ट केले."

पुण्यातील शिवाजीनगर परिसरात असलेल्या एका नामांकित शाळेत शिकणा-या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना समोर आली आणि एकच खळबळ उडाली. शाळेतील बाथरूममध्ये आरोपीने चिमुकलीवर अत्याचार केला होता. या प्रकरणी पुणे पोलिसांनी संशयित आरोपीचं स्केचही प्रसिद्ध केलं होतं. अखेर पोलिसांनी आरोपीला अटक केली. शिवाजीनगर नामांकित शाळेच्या अल्पवयीन मुलीच्या बलात्कार प्रकरणातील आरोपीला गुन्हे शाखेने पकडलं. धक्कादायक म्हणजे हा आरोपी पीडित मुलीच्या वडिलांना ओळखत होता. आरोपी हा वॉचमनचं काम करत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली. ३६ वर्षीय मंगेश पदमुळू नावाच्या या आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी मंगेश याने शाळेजवळ असलेल्या एका शोरूममध्ये वॉचमनचं काम केलं होतं. केवळ एकच दिवस त्याने तेथे काम केलं होतं. दुपारी ११ वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर येथील एका शाळेमध्ये ११ वर्षीय मुलगी गेली होती. त्यावेळी ३६ वर्षीय अनोळखी व्यक्तीने मी तुला ओळखतो असे सांगून शाळेच्या बाथरूम मध्ये नेलं आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. या घटने बाबत कोणाला काही सांगितल्यास तुला बघतो, अशी धमकी दिली होती. या घटनेनंतर पीडित मुलीने सर्वप्रथम घडलेला प्रकार आपल्या मैत्रिणीला सांगितला. मग तिने हा प्रकार वर्गशिक्षिकेला सांगितला. त्यानंतर वर्गशिक्षिकेने घडलेला संपूर्ण प्रकार पीडित मुलीच्या आई-वडिलांना सांगितला. त्या मुलीने आणि तिच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह अन्य कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला.

एका अज्ञात व्यक्तीने शाळेत शिरून अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्यानं पालकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं. या घटनेचे पडसाद अधिवेशनातही उमटल्याचं पहायला मिळालं. विधानसभेत शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी म्हटलं की, ही घटना खूपच गंभीर आहे. या संदर्भात एक नवीन धोरण आणण्यात येईल आणि त्यामाध्यमातून मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगले वातावरण देण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल.

आईच्या प्रियकराने तरुणीवर लैंगिक अत्याचार केले. तिच्या आई व बहिणीला मारून टाकण्याची धमकी देऊन वेळोवेळी जबरदस्ती केली. बलात्कार प्रकरणी पोलिसांनी त्या प्रियकराला अटक केली. मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे, इंदोरी तसेच भंडारा डोंगराच्या जंगलात २०१४ पासून ते ११ एप्रिल २०२२ या कालावधीत हा प्रकार घडला. जनार्दन सोमाजी शितोळे वय ४०, रा. बहुळ, ता. मावळ असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी २१ वर्षीय तरुणीने तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपी शितोळे हा फिर्यादी तरुणीच्या आईचा प्रियकर होता. त्याचे फिर्यादीच्या घरी येणे-जाणे असायचे. फिर्यादी तरुणी अल्पवयीन असल्यापासून आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. फिर्यादी तरुणीच्या आई व बहीण यांना मारून टाकण्याची धमकी देऊन वेळोवेळी वेगवेगळ्या ठिकाणी जबरदस्ती करून लैंगिक अत्याचार केले. आरोपीने रात्री दीडच्या सुमारास फिर्यादी तरुणीवर जबरदस्ती केली. या अत्याचाराबाबत तरुणीने आईला सांगितले. त्यामुळे आरोपीने शिवीगाळ करून तरुणीला हाताने मारहाण केली. फिर्यादी तरुणी अल्पवयीन असल्यापासून आरोपी तिच्यावर लैंगिक अत्याचार करीत होता. तिला धमकी दिल्यामुळे ती अत्याचार सहन करीत होती. तिच्या वयाच्या चौदाव्या वर्षापासून आरोपी तिच्यावर लैंगिक अत्याचार करीत होता. मात्र ते असह्य झाल्यानंतर तिने आईला सांगितले. त्यामुळे हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर आईसोबत पोलीस ठाण्यात येऊन पीडित तरुणीने तक्रार केली. बलात्कार प्रकरणी तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण करण्याच्या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीला अटक केली.

पुण्यात बाप लेकीच्या नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना घडली. पुण्याच्या शिरुर तालुक्यातील एका गावात ही घटना घडली. या घटनेनं गावात एकच खळबळ उडाली. जन्मदात्या नराधम बापाकडूनच आपल्या बारा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची दुर्दैवी घटना घडली. शिक्रापूर पोलीस ठाण्यात नराधम पित्याविरोधात बलात्कार आणि बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच पोलिसांकडून आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली. पुण्याच्या शिरूर तालुक्यातील एका गावात पित्याकडून पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेने परिसरातील लोकांमध्ये एकच खळबळ उडाली. पीडित अल्पवयीन मुलीचा नराधम बाप दारूच्या नशेत घरी आला होता. त्यामुळे त्यानं पत्नीशी वाद घातला. त्यानंतर चिडलेल्या नराधम बापानं दारूच्या नशेत घरात झोपलेल्या पोटच्या १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची खळबळ जनक घटना घडली. या घटनेनं बाप-लेकीच्या नात्याला काळिमा फासला गेला आहे. या नराधमाच्या कृत्यानंतर पीडित मुलीच्या आईनं परिसरात आरडाओरड करून आजूबाजूच्या लोकांना बोलावलं. त्यानंतर जमा झालेल्या लोकांनी नराधमावर तीव्र संताप व्यक्त केला. त्या नराधमावर स्थानिक नागरिकांकडून कठोर कारवाई करण्याची मागणी झाली होती.

पुण्यातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. घर सोडून गेलेल्या महिलेच्या दीराने तिच्या मुलांसोबतच दुष्कृत्य केल्याची घटना घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी ३० वर्षांच्या आरोपी काकाला अटक केली. या घटनेने पुणे हादरलं. पुण्यातील एका ३० वर्षीय महिलेचा पती घर सोडून निघून गेला. ती वडकी परिसरात राहते. ती मुलाच्या प्रसूतीसाठी ससून रुग्णालयात दाखल झाली होती. तर घरी तिचा ८ वर्षांचा मुलगा आणि ४ वर्षांची मुलगी एकटेच होते. मात्र, यावेळी अत्यंत संतापजनक घटना घडली. दीर त्यांना घेऊन स्वतःच्या घरी गेला होता. तर दुसरीकडे या महिलेला मुलगा झाला. घरी आल्यावर तिने मुलीची व मुलाची अवस्था पाहिल्यावर चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. वडकी येथे राहणा-या या महिलेला पहिल्या पतीपासून ८ वर्षाचा एक मुलगा व ४ वर्षाची मुलगी आहे. आता ती मागील ५ महिन्यांपासून दुस-या पतीबरोबर राहत होती. मात्र, गेल्या ४ महिन्यांपासून तिचा दुसरा पती घर सोडून निघून गेला आहे. आपली उपजीविका भागवण्यासाठी ती भंगार गोळा करते. ती गर्भवती असल्याने आता तिचे दिवस भरत आले. यामुळे ती तिच्या मुलांना शेजा-यांकडे सोपवून ससून रुग्णालयात २० मे रोजी दाखल झाली. यानंतर तिला मुलगा झाला. रुग्णालयातून तिला २३ मे रोजी सोडण्यात येणार होते. त्यामुळे तिने मोठ्या दिराला फोन करून बोलावले. यानंतर त्यांनी तिला वडकी येथील घरी सोडले. यावेळी शेजारी चौकशी केल्यावर तिचा धाकटा दीर मुलांना घेऊन त्याच्या घरी गेल्याचे तिला समजले. दुस-या दिवशी या महिलेने पिंपळमळा येथून आपल्या मुलांना घरी आणले. मात्र, मुलांच्या अंगावर वळ दिसल्याने तिने दिराला विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. यानंतर दुस-या दिवशी मुलांना आंघोळ घालताना मुलीबाबत काहीतरी वाईट घडल्याचे तिच्या लक्षात आले. तिने चौकशी केल्यावर छोट्या काकाने अत्याचार केल्याचे चार वर्षांच्या मुलीने सांगितले. तसेच त्याचा खूप त्रास होत असल्याचेही तिने सांगितले. तर सोबतच मुलाबाबतही हाच प्रकार घडला होता. त्याच्यावर काकाने अनैसर्गिक अत्याचार केला होता. या दोघांनी सांगितलेल्या हकीकतीने तिच्यावर जणू आभाळच कोसळले. तिने लोणी काळभोर पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी या ३० वर्षांच्या आरोपी काकाला अटक केली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस तपास करत आहेत.

पिंपरी-चिचवडमध्ये १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ६५ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली. त्याच्या २८ वर्षीय साथीदाराला, ज्याने आरोपीला मुलीला हल्ल्यापूर्वी सार्वजनिक रस्त्यालगत मातीच्या ढिगा-यामागे ओढून नेण्यात मदत केली होती, त्यालाही अटक करण्यात आली. काही वाटसरूंनी त्यांना पाहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. मजूर म्हणून काम करणारे दोघे आरोपी, मुलीच्याच झोपडपट्टीत राहत होते. या प्रकरणाचे तपास अधिकारी म्हणाले, दुपारी दोन आरोपींनी मुलीला जबरदस्तीने त्यांच्यासोबत जाण्यास भाग पाडले. त्यांनी तिला मातीच्या ढिगा-या मागे ओढले. २८ वर्षीय तरुणीने तिला रोखले कारण ६५ वर्षीय व्यक्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि जबरदस्तीने ओरल सेक्स केला. मुलीच्या ओरडण्याने तेथून जाणारे काही लोक सावध झाले आणि त्यामुळे ही घटना उघडकीस आली. त्यानंतर दोघांना पोलीस ठाण्यात नेण्यात आले आणि भारतीय दंड संहिता कलम ३७७ नुसार अटक करण्यात आली. त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

एका अल्पवयीन मुलीवर एका लॉजमध्ये अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली. पुण्यातील तळेगाव दाभाडे येथे हा प्रकर घडला आहे. याप्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी आरोपीला अटक केली. शुभम लॉजमध्ये ही घटना घडली. पीडितेच्या आईने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या सगळ्या प्रकरणाचा तपास तळेगाव दाभाडेचे पोलीस करत आहेत. पोलिसांनी २३ वर्षीय आरोपीला अटक केली असून तो तळेगाव दाभाडे येथील रहिवासी आहे. तक्रारदाराच्या घराशेजारी आरोपीचे नातेवाईक राहत होते. त्या परिसरात तो वारंवार येत असे. त्यामुळे आरोपीची तक्रारदाराच्या १२ वर्षीय मुलीशी ओळख झाली. आरोपी मुलीला लॉजवर घेऊन गेला. येथे आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तसेच मुलीला व तक्रारदाराला जीवे मारण्याची धमकी दिली. पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

पुण्यातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात एक अत्यंत किळसवाणा प्रकार समोर आला आहे. एका व्यक्तीने आपल्या पत्नीला त्याच्या दोन मित्रांसोबत शरीरसंबंध ठेवण्यास जबरदस्ती केली. हा सर्व प्रकार सुरू असताना महिलेचा पती कोप-यात उभं राहून हे पाहत होता. या प्रकारानंतर महिलेने पती आणि त्याच्या दोन मित्रांविरोधात पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पती पत्नीला मानसिक त्रास देत होता. तिची इच्छा नसतानाही त्याने २०२० मध्ये हडपसर येथील एका लॉजवर मित्रांसोबत शरीरसंबंध ठेवण्यास भाग पाडले. यानंतर जुलै २०२१ मध्ये कोरेगाव पार्क परिसरात एका फ्लॅटवर दुस-या एका मित्रासोबत पत्नीला अनैसर्गिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. हे सर्व होत असताना पती मात्र कोप-यात उभं राहून पाहत होता. हे सर्व वारंवार घडत असल्याने शेवटी संतापलेल्या पत्नीने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलीस या प्रकरणात तपास करीत आहे. पतीच्या अशा कृत्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. कोणता पती आपल्या पत्नीसोबत अशा प्रकारचं कृत्य करू शकतो, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# शाळेच्या जगात रमलो आम्ही सवंगडी...



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**स्वत:च्या घरापलीकडचं जग बघण्याची सुरुवात शाळेपासून होते. मग शाळेतले गुरुजन विद्यार्थ्यांची जडणघडण करतात. शिक्षण काळात अनुभवलेले क्षण हृद्य असतात. पुन: प्रचिती घ्यावीशी वाटावी, असे अनमोल असतात. हाच काळ चाळीशी-पन्नाशीनंतर प्रत्येकाच्या मनात भेटीची ओढ निर्माण करतो. शाळेतले अनेक प्रसंग, सवंगडी आठवू लागतात अन् भेटीची आतुरता निर्माण करतात. हा मैत्रीपूर्ण अनुभव काही दिवसांपूर्वी योगायोगाने जुळून आला.**

श्री गौरीदत्त मित्तल विद्यालयचे सन १९८८ साल चे एस.एस.सी मधून बाहेर पडलेले माजी विद्यार्थी तब्बल ३३ वर्षानंतर सायन येथे एका हॉटेलमध्ये काही दिवसांपूर्वीजी एकत्र भेटलो आणि पुन्हा एकदा शाळेत गेल्याचा अनुभव आला. सुभाष कर्डक, मधुकर इंगळे, सूर्यकांत केळशीकर, अनिल वाघ, श्रीधर तावरे, भरत वाळके, शैलेश पाटणकर, सुंदर बोराडे, राजेश सोनावणे, सुधीर सोनावणे, राजेश पाटील, गिरीश भोईर, अंकुश जाधव आणि प्रविण घावरे हा आमचा ग्रुप जमला. आम्ही सगळ्यांनी एकत्र बसून शाळेतील मागील आठवणी एकमेकांना शेअर केल्या आणि एक वेगळाच अनुभव आला. एकमेकांचे सुख-दुःख जाणून घेतांना आपण आयुष्यात किती काय काय केले याची प्रचिती झाली. मी तर खूपच भावूक झालो होतो आणि माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू आले होते. मग आम्ही एकत्रित बसून जेवण केले आणि केक ही कापला. अनेक वर्षांनंतर शाळेतले आपले सवंगडी समोर आले अन् एकमेकांमध्ये झालेले बदल हाच एक मोठा चर्चेचा, विनोदाचा आणि गप्पांचा विषय झाला. खूप मजा आली. शाळेतल्या बसण्याच्या जागा, सर शिकवताना घडलेल्या गमतीशीर घटना आणि सरांनी केलेल्या शिक्षा यांच्या आठवणी अर्थातच चर्चेत आल्या. खरंच ते शाळेतले दिवस, मित्र आणि शिक्षकांची खूप आठवणी जाग्या झाल्या होत्या.आमच्या बरोबरचे अनेक मित्र भेटलेच, पण त्याचबरोबर असंख्य माजी सवंगड्यांच्या गाठीभेटीही झाल्या. श्रवणीय हिंदी गाणी शाळेच्या त्या सुखद काळात आम्हा सर्वांना आपसूकच घेऊन गेली. शिवाय एक आगळावेगळा संस्मरणीय सोहळा शाळेच्या ऋणात राहून करता आला, याचं मोठं समाधान आम्हा सर्वांना लाभलं. काही वर्षांनंतरची ही शाळेची भेट प्रत्येकाच्याच हृदयातील कप्पा अजून समृद्ध करून गेली. धन्यवाद.

**श्रीधर तावरे**



# पंढरीची वारी आणि वारकरी संप्रदाय...



बबलू कराळे
संपर्क क्र. : 7218029838

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणजे पंढरपूरचा श्री विठ्ठल त्याच ठिकाणी आपले दैवत आहे असे माननारे एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय. वारकरी संप्रदाय, म्हणजे पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला वारकरी संप्रदाय, असाच अर्थ घेतला जातो. ह्याचे मुख्य कारण म्हणजे विठोबा वा विठ्ठल वा पांडुरंग ह्या आपल्या उपास्य दैवताच्या वारीला ह्या संप्रदायाने जितके महत्त्व दिले आहे,तितके अन्य कोणत्याही पंथाने त्याच्या उपास्य दैवताच्या वारीला दिलेले नाही. वारकरी संप्रदायाच्या आचारधर्मानुसार संप्रदायाच्या अनुयायांनी प्रतिवर्षी दोन वेळा-म्हणजे आषाढ शुद्ध एकादशीस व कार्तिक शुद्ध एकादशीस-श्रीविठ्ठलाची वारी पंढरपूर क्षेत्री जाऊन केली पाहिजे. शुद्ध माघी एकादशी व शुद्ध चैत्री एकादशी ह्या दोन दिवशीही पंढरपूर येथे मोठ्या संख्येने वारकरी जमतात.**

तथापि आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या प्रमुख मानल्या जातात. त्यांतही आषाढीला महत्त्व विशेष आहे. ज्यांना वर्षातून एकदाच-म्हणजे आषाढीला किंवा कार्तिकीला-येणे शक्य असते, त्यांनी तसे केले तरी चालते; परंतु प्रतिवर्षी किमान एकदा तरी वारी करणे, ही वारकऱ्यांची मुख्य साधना होय. वारकरी संप्रदायाला 'माळकरी संप्रदाय' असेही एक पर्यायी नाव आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर अनेक धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहेच; पण वारकरी संप्रदायात ही तुळशीच्या मण्यांची माळ घातल्याखेरीज कोणाला वारकरी होताच येत नाही. माळ घालणे, म्हणजे एक नवा आध्यात्मिक जन्म घेणे, असे मानले जाते. वारकरी संप्रदायात माळ म्हणजे निव्वल स्मरणी नव्हे. हा संप्रदाय भागवत धर्मातच अंतर्भूत होतो. किंबहुना त्यास 'भागवत धर्म' असेही म्हटले जाते. भागवत धर्म हा प्रामुख्याने वैष्णव संप्रदाय म्हणूनच विख्यात असून त्यात विष्णु आणि विशेषतः त्याचा कृष्णावतार वासुदेव भगवान हाच उपास्य आहे आणि वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत विठ्ठल, हे विष्णूचा अवतार मानल्या गेलेल्या श्रीकृष्णाचे रूप मानले गेले आहे. ह्याच कारणासाठी पंढरपुरास 'दक्षिण द्वारका' असे संबोधण्यात येते. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असलेल्या विठ्ठलाचे निर्देश श्रुतिस्मृतिपुराणांत आलेले नाहीत. विष्णुसहस्रनामांत तसेच विष्णुच्या मानल्या गेलेल्या चोवीस अवतारांत विठ्ठलाचा अंतर्भाव झालेला दिसत नाही. तथापि विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकांपासून असाधारण अशी वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मूळ हे गोपजनीय परंपरेत आहे, असे म्हणतात.

पंढरपूरचा विठोबा हे वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असल्यामुळे वारकऱ्यांचे मुख्य क्षेत्र पंढरपूर आणि तीर्थ चंद्रभागा होय. विठोबा हे श्रीकृष्णाचेच रूप आहे, अशी सर्व संतांची धारणा असल्यामुळे वारकरी संप्रदाय हा कृष्णोपासकही आहेच. तथापि तो रामाचाही उपासक आहे. गीता, भागवतपुराण, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरकृत हरिपाठ, संस्कृतातील भागवतपुराणाच्या एकादश स्कंधावरील संत एकनाथकृत एकनाथी भागवत,भागवतपुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ अशा चार श्लोकांवर एकनाथांनीच लिहिलेले चतुःश्लोकी भागवत, एकनाथांचा हरिपाठ आणि तुकारामांची अभंगगाथा, हे ग्रंथ वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत होत. त्यांतही ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकोबांची अभंगगाथा, ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. ह्या संप्रदायातील इतर संतांच्या रचनाही वारकरी अर्थातच आदराने वाचतात. वारकरी संप्रदायाची दीक्षा घेण्याचा विधी अगदी साधा असतो. ह्या संप्रदायात फड (प्रत्येक महंताच्या वा वारकरी साधूच्या भोवती असलेला त्याच्या शिष्यमंडळींचा समुदाय)असतात. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याला अशा एखाद्या फडप्रमुखाकडून तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालून घ्यावी लागते. दीक्षेची पद्धत अशी : ही माळ आणून दीक्षा देणाऱ्या साधूकडे वा फडप्रमुखाकडे जावयाचे. तो ती माळ ज्ञानेश्वरीवर ठेवतो आणि प्रतिवर्षी पंढरीची वारी करण्याचे वचन दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याकडून घेतो. वर म्हटल्याप्रमाणे पंढरपूरची किमान एक तरी वारी केलीच पाहिजे. तसेच आळंदीची वारीही केलीच पाहिजे. संप्रदायाच्या इतर नियमांची आणि आचारधर्माची कल्पनाही दीक्षा घेणाऱ्याला फडप्रमुख देतो. हे नियम असे आहेत : १. सत्य बोलावे. २. परस्त्रीला मातेसमान मानावे. ३. कांदालसूण आणि मांसाहार वर्ज्य करावा. ४. मद्यपान वर्ज्य करावे. ५. रोज हरिपाठ करावा, तसेच 'रामकृष्णहरी' ह्या मंत्राचा जप करावा. ६. प्रपंचातील कर्मे श्रीविठ्ठलस्मरण करीत पार पाडावी. हे सर्व नियम पाळण्याचे कबूल करून ज्ञानेश्वरीवर ठेवलेली तुळशीच्या मण्यांची माळ तो भक्त उचलतो आणि 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल' ह्या गजरात गळ्यात घालतो. दीक्षाविधीच्या वेळी गळ्यात घातलेली ही तुळशीची माळ काही कारणाने तुटल्यास ती पुन्हा गुंफून गळ्यात घालीपर्यंत वारकऱ्याला अन्नसेवन करता येत नाही. वारकऱ्याच्या आचारधर्माचा आणखी एक भाग, म्हणजे त्याने गो पी चंदनाचा ऊर्ध्व पुंड्र लावून मुद्रा लावल्या पाहिजेत, त्याचप्रमाणे द्वादश टिळेही लावले पाहिजेत. प्रत्येक वारकरी पंढरपूरची वारी वर्षातून किमान एकदा तरी करतोच, तथापि ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर कार्तिक वद्य एकादशीसही वारकरी आळंदीला जाऊ लागले हा उल्लेख वर आलाच आहे. संत नामदेवांच्या (१२७० - १३५०) काळातच ही आळंदीवारी सुरू झाली. सासवड, त्र्यंबकेश्वर, एदलाबाद, पैठण, देहू, पिंपळनेर,आळबेल्हे इ. ठिकाणीही वारकऱ्यांची यात्रा भरते. त्या त्या स्थळी झालेल्या विशिष्ट संतांच्या वास्तव्यामुळे ही ठिकाणे पवित्र मानली गेली आहेत. तथापि विठ्ठलाच्या सर्व वाऱ्या शुद्ध पक्षातल्या असून भक्तांशी संबंधित असलेल्या स्थानी होणाऱ्या वाऱ्या वद्य पक्षातल्या आहेत. पंढरीची वारी पायीच करण्याचा प्रघात एके काळी होता व आजही अनेक वारकरी तो पाळतात. वाहनांची सोय झाल्यामुळे बरेचसे लोक मोटारीने वा आगगाडीसारख्या वाहनानेही जातात. एरव्ही ठिकठिकाणी विखुरलेले वारकरी पंढरीच्या वाटेवर एकमेकांना भेटू शकतात. लाखो वारकरी प्रतिवर्षी पंढरपूर येथे जमतातच; परंतु पंथाची दीक्षा न घेतलेले अनेक विठ्ठलभक्तही येतात. आंध्र-कर्नाटकांतून येणाऱ्यांची संख्याही मोठी असते. पंढरपूरला आल्यानंतर सर्व वारकरी चंद्रभागेत स्नान करून श्रीपांडुरंगाचे व पुंडलिकाचे दर्शन घेतात. पंढरपुरात आल्यावर पांडुरंगाचे दर्शन घेण्यापूर्वी भक्तराज पुंडलिकाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. मग गावप्रदक्षिणा होते. उरलेला वेळ भजन-कीर्तनात जातो. इतर तीर्थांच्या तुलनेत पंढरपूरचे एक वैशिष्ट्य, म्हणजे इथे तीर्थोपवास करीत नाहीत, श्राद्ध, मुंडण हेही नाही. आषाढी आणि कार्तिकीच्या आदल्या दिवसापासून म्हणजे शुद्ध दशमीपासून प्रत्येक फडावर भजन-कीर्तनांचा कार्यक्रम असतो. रात्री हरिजागर होतो.

प्रत्येक वारकरी आपापल्या फडावर कीर्तनासाठी जात असला, तरी इतर फडांवरचे कीर्तन वा भजन ऐकायला कोणालाच मज्जाव नसतो. दशमीपासून चतुर्दशीपर्यंत असे कार्यक्रम चालु असतात. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी पंढरपूरच्या दक्षिणेस, पंढरपूरपासून जवळच असलेल्या गोपाळपूर येथे काल्याचा कार्यक्रम असतो. गोपाळपूर हे एक वाडीवजा गाव आहे. तेथे गोपाळकृष्णाचे मंदिर आहे. सतराव्या शतकात (१६६६) त्याचे बांधकाम सुरू झाले होते. शामजी अनंत नांदिवरेकर व त्यांचे आप्त ह्यांनी हे मंदिर बांधावयास आरंभ केला आणि गजेंद्र यशवंत नावाच्या व्यक्तीने ते बांधकाम पूर्ण केले. त्या मंदिरात भजने गात दिंड्या जातात. गोपाळकृष्णाला काला दिला जातो. काल्याच्या लाह्या वारकरी परस्परांच्या मुखांत घालतात आणि त्यानंतर वारीची सांगता होते. घरी गेल्यावर कानवल्यांचे (मुरडीव) भोजन करतात. इतके झाले म्हणजे यात्रा संपते.




# पारंपरिक पदार्थांची अस्सल मेजवानी : पदार्थायन



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**'पदार्थायन' हे पुस्तक फक्त पाककृतीचं नाही तर त्या पदार्थांशी जोडलेल्या आठवणींची सरमिसळ आहे. या पदार्थांशी त्या त्या जागेच्या, माणसाच्या स्मृती जोडल्या गेल्या आहेत. या पुस्तकाची खासियत अशी की टिपिकल पाककृतीच्या पुस्तकासारखे हे पुस्तक नाही. ह्या पुस्तकाला ललितलेखनाचा जो काही तड़का लेखिकेने दिला आहे, त्यामुळे अगदी गोष्ट कथन करत त्या पदार्थांची निर्मिती, त्याची प्रक्रिया लेखिका या पुस्तकाद्वारे सांगत आहे.**

मानवाच्या मूलभूत गरजांपैकी अत्यंत महत्वाची गरज म्हणजे अन्न. माणूस जी धावपळ करतो ती पोटाची खळगी भरण्यासाठी. भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. प्रत्येक राज्याची भौगोलिक रचना, हवामान वेगळे त्याप्रमाणे प्रत्येकाची खाद्यसंस्कृती वेगळी आणि ख़ास आहे. मराठी माणसाची खाद्यसंस्कृती ही अशीच चिऊ काऊच्या मऊ दूधभातापासून सुरु होणारी ही खाद्यसंस्कृती विदर्भातल्या सावजीच्या चमचमीत रस्स्यापर्यंत किंवा कोल्हापूरच्या पांढऱ्या रस्स्यापर्यंत विविधांगाने बदलली आहे. दर कोसावर भाषा बदलते असं म्हणतात महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर इथे फक्त भाषाच नाही तर खाण्यापिण्याची रितही बदलते. चौरस आहार ही संकल्पना मराठी माणसाच्या रोजच्या साध्या जेवणातही प्रत्यक्षात उतरली आहे.

'अन्न हे पूर्णब्रम्ह' हे तत्त्व महाराष्ट्रीय अगदी मनापासून पाळतात. म्हणजेच मराठी संस्कृतीत अन्नाचा मान विश्वनिर्मिती करणाऱ्या ब्रम्हदेवासमान आहे. आपल्या मराठी पदार्थांमध्ये नवनवीन पदार्थांची भर पडत आहे. घरगुती पोळी-भाजी, वरण-भातासोबतच चायनिज, पंजाबी, गुजराती, दाक्षिणात्य खाद्यसंस्कृती वाढत चालली आहे. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव असल्याने नव्या पिढीला बर्गर, पिज़्ज़ा, व्रैप, नूडल्स, फ्रैंकी, फ्रेंच फ्राइज या पदार्थांची गोड़ी अधिक वाटते. पण आपले जे असल्ल पारंपरिक पदार्थ आहेत ते आताच्या पिढीला माहितच नाहीत.कोकणातील खाद्यसंस्कृती इतकी परिपूर्ण आहे, तेथे बनवले जाणारे पदार्थ हे चवीला छान आणि रुचकर असतात जे घरोघरी बनवले जातात. प्रत्येक सणाला ठराविक पदार्थ बनवून एकमेकांना खाऊ घालण्याची आपली संस्कृती आहे. प्रेमाचा मार्ग पोटातून जातो असे म्हणतात. यूट्यूबर मधुरा बाचल ह्या ऑनलाइनच्या माध्यमातून आपले मराठी पदार्थ सगळ्यांपर्यत पोहचवत आहेत तर जयंती कठाळे नव्वारी नेसून महाराष्ट्रीय पदार्थ साता समुद्रापार गाजवत आहेत.

मराठी खाद्यसंस्कृतीची ओळख व्हावी , आपले पारंपरिक पदार्थ नव्या पिढ़ीपर्यत संक्रमित होत रहावे यासाठी एक आगळं- वेगळं पाककृतीचं पुस्तक आपल्या भेटीला आले आहे. लेखिका - निवेदिका वृंदा दाभोलकर लिखित 'पदार्थायन' हे पाककृतीचं पुस्तक.. हे पुस्तक नवनवीन पदार्थ आवडीने करु पाहणाऱ्या, गृहिणी,लेकी ,सुना ,आपल्या घरापासून लांब असलेल्या, पदार्थ बनवण्याची आवड़ असणाऱ्या पुरुष मंडळी, शेफ तसेच असल्ल खवय्येगिरी करणाऱ्या प्रत्येकाला हे पुस्तक उपयोगी पडेल. या पुस्तकात नेहमीचे न्याहारीचे पदार्थ , गोड पदार्थ, शाकाहारी जेवणापासून ते मांसाहारी पदार्थांपर्यतच्या पाककृती यात समाविष्ट आहेत.


आपल्या शरीराला जी पोषक तत्वे आवश्यक असतात ते तत्वे असलेल्या पदार्थांचा समावेश आपल्या जेवणात असणे गरजेचे आहे. गृहिणी म्हणून कुटुंबीयांना जेवण करून वाढणे हे जसे तिचं कर्तव्य असते तसे कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेणे ही तिचे कर्तव्य असते. बऱ्याच भाज्या किंवा पदार्थ आवडत नाहीत म्हणून खाल्ले जात नाहीत. ही गोष्ट लक्षात घेऊन वृंदा दाभोलकर यांनी 'पदार्थांयन' च्या माध्यमातून अशा पाककृती यात दिलेल्या आहेत, जे पदार्थ खाणे शरीरासाठी आवश्यक आहेत. पाककृतीसोबतच कोणत्या भाज्या - कड़धान्यातून आपल्याआ शरीराला ऊर्जा मिळते तसेच खनिजे मिळतात याची माहिती सुद्धा दिली आहे. या फळभाज्या , पालेभाज्या, कड़धान्य शरीराच्या व्याधींवर किती उपयोगी आहेत, यांची अगदी महत्त्वपूर्ण माहिती यात दिली आहे. पदार्थ बनवण्यासोबतच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची पुरेपूर काळजी घेते ती गृहिणी .. नाही का ! तीच गृहिणी संपूर्ण पुस्तकात वावरताना दिसते.

या पुस्तकाचा आकृतीबंध ललित असल्याने प्रत्येक लेखाचं शीर्षकही कमाल आहेत. सर्वसामान्य टपरीवरचा चहा ते फाइव स्टार मधला चहा किंवा अन्य टी सटोल वरील चहा .. त्याच्याशिवाय सगळं अपूर्ण वाटते अशा चहाची कहाणी 'चहा आणि बरेच काही' लेखातून सुरेख कथन केली आहे. बरे अमुक अमुक पदार्थ कुठे चांगला मिळतो याचं गुपित ही लेखिका आवर्जून सांगतेय कारण त्यानाही खवय्येगिरी करायला आवडते. आठवड्यातून एक- दोनदा बनवल्या जाणाऱ्या उपमा, पोहे या जगज़ाहीर पदार्थांची गंमत आणि त्याचं आपल्या न्याहारीतलं स्थान अढळ असल्याचं 'सर्वमान्य पोहे' आणि 'प्रेमाचा उपमा' लेखातून जाणवतं. थालीपीठ, मिसळ यांच्या चवीचं कौतुक तरी किती करावे नाही का ? पुस्तकातील पदार्थांची नुसती नावे वाचली तरी तोंडाला पाणी सुटते. या पुस्तकातील पाककृती या सात्विक, संतुलित आहारानी पूर्ण, आवश्यक पोषण तत्वांनी युक्त आहेत.

लेखिका बटाटयाला 'सौभाग्यवती बटाटा' का म्हणते यासाठी 'बटाटा माहात्म्य' नक्की वाचाच. दोड़का, वांगी, कारली, भोपळा, सुरण तसेच विस्मरणात गेलेली केळफुलाची भाजी ह्या पाककृती सुरेखपणे मांडल्या आहेत.आपले मराठमोळे पदार्थ दिसायला छान आणि चवीला इतके टेस्टि आहेत की, डाइट फॉलो करणारे डाइट विसरून जातील , इतके हे पदार्थ भुरळ पाडतात.

कोकण ही देवभूमीच आहे. कोकणाला लाभलेले नैसर्गिक सौंदर्य जसे कमालीचे आहे तशीच कोकणाला लाभलेली खाद्यसंस्कृती जगात भारी आहे. कोकणात घरोघरी लग्न, पूजा, उत्सवाला खास पदार्थ आवर्जून बनवले जातात ,शहरात याचं प्रमाण कमी आहे. आपली संस्कृती जपण्यासाठी ,पारंपरिक पदार्थ नव्या पिढीला माहित व्हावेत यासाठी लेखिकेने यात पारंपरिक कोंकणी पदार्थही समाविष्ट केले आहेत. कोकण म्हंटले की समुद्रकिनारा आला आणि जेवणात भात आणि माशाचं कालवण .. अहाहा.... सोबत सोलकढी म्हणजे स्वर्गच जणू ! मत्स्यप्रेमींसाठी खास पाककृती यात दिलेल्या आहेत. सुरमई, पापलेट, बांगड़ा, चिंबोरी, शिंपल्या,बोंबिल, कोलंबी फ्राय किंवा तिखलं / कालवण याची झणझणीत आणि चविष्ट पाककृती वाचून मत्स्यप्रेमी खुश होतील. तिखटासोबतच गोड़वा पसरवणाऱ्या पदार्थांची रेलचेल सुद्धा यात आहे. सांदणं, पानगी, पातोळया, रसातले शिरवाळे, मोदक, सात कप्पी घावण , मनगणं कोकणात हमखास बनवले जातात. यातील काही पदार्थांची नावे अपरिचित वाटत असली तरी ती वेगवेगळ्या ठिकाणी वेगळ्या नावाने ओळखले जातात. या पदार्थांच्या पाककृती पुस्तकात देऊन गोड़ पदार्थांमधील आपले मराठमोळे पदार्थ किती रूचकर आणि अवीट गोड़ीचे आहेत, याची जाणीव होते.

जीवनातील व्यस्ततेमुळे, फास्ट फूडच्या ओढ़ीने झटपट बनवण्याच्या विचाराने किंवा वेळेच्या अभावामुळे आपले पारंपरिक पदार्थांकडे थोडं दुर्लक्ष होताना दिसत आहे. पण 'पदार्थायन' हे पुस्तक आपल्या पारंपरिक, रुचकर आणि पोषक पदार्थांचं महत्त्व अधोरेखित करत आहे, याचा अभिमान वाटतो. आपले मराठी पारंपरिक पदार्थ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्यासाठी 'पदार्थायन' चं योगदान आहे, ही आनंदाची बाब आहे.या पुस्तकातील रंगीबेरंगी चित्र , पुस्तकाची बांधणी ,आकृतिबंध सुरेख आहे आणि त्यात पुस्तकाला डॉ.विठ्ठल कामत सरांची प्रस्तावना म्हणजे 'दुधात साखरच '. मुखपृष्ठही मनमोहक. आपल्या स्वयंपाकघरात असे छान छान पदार्थ बनवून आपल्या प्रियजनांना खाऊ घाला आणि आपल्या पारंपरिक पदार्थांची माहिती व महत्व पुढील पिढीपर्यत पोहचवत रहा यासाठी प्रत्येक स्वयंपाकघरात 'पदार्थायन' हे पुस्तक असायलाच हवे.



# डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा.... रिंगण



उद्धवबापू फड
संपर्क क्र.: 9765588800

आधुनिक केसरी

**अत्यंत शिस्तबद्ध रिंगण भरधाव वेगाने दौडणार... सारेच डोळ्यांचे पारणे फेडणारे... आषाढ महिना आला की वारकऱ्यांना वेध लागतात ते आषाढी एकादशीचे... पंढरीच्या पांडुरंगाचे... पण वारीत प्रत्यक्ष विठूमाऊलीचं दर्शन घेण्यापूर्वी वारकरी आतुरतेने वाट पाहातात ती रिंगण सोहळ्याची... तो दिवस उजाडला की ते मोठ्या उत्साहात रिंगण सोहळ्यात सामील होतात. बरीच वर्षे पंढरपूरच्या वारीत नित्यनेमाने सहभागी होणाऱ्यामध्ये मीही एक निःसीम विठ्ठलभक्त. रिंगण... त्यातला अश्व... वारकऱ्यांचा प्रचंड उत्साह... ही मजाच काही आगळीवेगळी असते.**




टाळ-मृदंगाचा गजर अन् विठ्ठलाचे अभंग आळवीत पंढरीच्या वाटेवर चालणाऱ्या पावलांना एका अनोख्या चैतन्याचे बळ मिळत असते. पण, सलग वाट चालत असताना वारीला काहीतरी वेगळेपण मिळाले, तर हे बळ द्विगुणीत होत असते. पालखी सोहळ्यातील हे वेगळेपण म्हणजेच रिंगण सोहळा! वारकऱ्यांचे शीण घालवणारा सोहळा म्हणजे "रिंगण". टाळ मृदुंगाचा गजर, भगव्या पताकांची दाटी, अश्वाकडे रोखलेल्या नजरा, अश्वांची भरधाव दौड, ग्यानबा तुकाराम, ग्यानबा तुकाराम" असं उत्साहवर्धक आणि स्फूर्तीदायी वातावर अश्वांच्या दौडीनंतर माती कपाळी लावण्यासाठी अक्षरशः झुंबड उडते. हे सगळं काही नेत्रदीपक डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. हे सगळं अनुभवता आलं. रिंगणानंतर होणारा उड्यांचा खेळ, पावली, फुगडी हे सारे पाहताना आम्हीही त्यात दंग होतो. आम्ही सुद्धा फुगडी, पावली खेळत वारी जगलो. म्हातारी बाई तरूणींना लाजवेल अशी फुगडी घालते. म्हातारा टाळ वाजवत उड्या मारतो, नाचतो. या सर्वांना जर विचारलं, की या वयात हे कसं शक्य होतं? तर सगळ्यांचं उत्तर एकच आहे की, आमचं सगळं आयुष्य आम्ही विठ्ठलाला वाहिलेलं आहे आणि तोच हे करवून घेतो.

**भान हरपून खेळ खेळतो,**
**दंगतो भक्तीत वैष्णवांचा मेळा..**
**भक्तिने भारलेला रिंगण सोहळा**
**पाहावा 'याचि देही याचि डोळा'**

रिंगण हा पालखी सोहळ्याचा एक अविभाज्य भाग असला, तरी वारीच्या परंपरेत त्याला वेगळे स्थान नाही. वारकऱ्यांची पाऊले वाटेवर असताना केवळ चालण्याबरोबर मध्येच काही खेळ खेळायला मिळाले, तर वारीचा आनंद वाढून पुढच्या वाटचालीचा उत्साह वाढतो. त्यामुळेच या रिंगणाचे पालखी सोहळ्यामध्ये स्थान आहे. मुळात वारीच्या वाटेवर शिण, भार दूर करण्यासाठी काही खेळ खेळले जातात. वारीचा पालखी सोहळा झाला व त्यानंतर हा सोहळा एका शिस्तीत व दिमाखात पुढे जाऊ लागला. शिस्तीची हीच परंपरा वारकऱ्यांच्या खेळातही आली अन् त्यातून शिस्तबद्ध रिंगण सोहळा निर्माण झाला.

वारीच्या वाटेवरील हे रिंगण सोहळे आता सुरू होणार आहेत. 6 जुलैला चांदोबाचा लिंब येथे माउलीच्या सोहळ्याचे पहिले उभे रिंगण होणार आहे. याच दिवशी बेलवाडीत तुकोबांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण होणार आहे. उभे व गोल असे रिंगणाचे दोन प्रकार आहेत. गोल रिंगण हा शब्दप्रयोग एकवेळ ठीक वाटत असला, तरी रिंगण उभे कसे असू शकते, असा प्रश्न काहीजण विचारतात. उभे रिंगण हे पालखी मार्गावरच केले जाते. टाळ-मृदंगाचा गजर करीत मार्गाच्या दुतर्फा वारकरी उभे राहतात व त्यामधून अश्व धावतात. अश्वाच्या काही फेऱ्या झाल्यानंतर रिंगणाचा हा सोहळा पूर्ण होतो.

गोल रिंगण हा वारकऱ्यांच्या व भाविकांच्या दृष्टीनेही पालखी सोहळ्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण असतो. रिंगणासाठी एक मोठे मैदान सज्ज करण्यात येते. मैदानाची गोलाकार आखणी केली जाते. केंद्रभागी पालखी ठेवण्याची जागा, त्याच्या भोवती वारकरी उभे राहण्याची जागा व त्यानंतर अश्व धावण्याच्या गोलाकार जागेची आखणी केली जाते. या सर्व परिघाबाहेर भाविकांना उभे केले जाते. रिंगण सुरू होण्यापूर्वी 'रिंगण लावणे' हा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. पालखी मार्गावरून रिंगणाच्या दिशेने येताना ध्वनिक्षेपकावरून सूचना दिल्या जातात व त्यानुसार एकेक दिंडी शिस्तबद्धपणे आखलेल्या रिंगणात दाखल होते. प्रत्येक दिंडीतील विणेकरी, टाळकरी, पखवाज वादक, झेंडेकरी व डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला वेगवेगळ्या गटाने गोलाकार उभ्या राहतात. पालखी व दिंड्या रिंगणात दाखल झाल्यानंतर शेकडो मृदंगाच्या व टाळांच्या गजरात लाखोंच्या मुखातून 'ज्ञानोबा-तुकाराम' असा घोष करीत ठेका धरला जातो अन् रिंगण सोहळा सुरू होतो. झेंडेकरी, विणेकरी, टाळकरी, मृदंग वादक, तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला क्रमाने रिंगणातून धावतात. शेवटी अश्व रिंगणात धावतात अन् रिंगण सोहळा आनंदाची सर्वोच्च पातळी गाठतो. त्यानंतर याच जागी फुगड्या घालण्याबरोबरच विविध खेळ रंगतात.

साठ ते सत्तर वयाच्या महिला, पुरुष वारकरी तरुणांनाही लाजवतील अशा आवेशात रिंगणात धावत असतात. वाटेवर चालून पाय थकतात, मग रिंगणात धावायला हे बळ येते कुठून, हे एक कोडेच आहे. रिंगणाची शिस्तबद्धताही अचंबित करणारी असते. येथे कुणीच कुणाला तू असं कर, तसं कर वगैरे सांगत नाही. तरीही सगळं बिनबोभाट सुरू असतं. कारण प्रत्येकाच्या मनात केवळ विठूमाऊलीला भेटण्याची आस असते. दुसरं काही कुणाच्या मनात नसतंच त्यावेळी. स्वयंशिस्त असते.

**(लेखक उध्दव बापु फड हे महाराष्ट्र शासनाच्या प्रबोधन दिंडीचे प्रमुख असुन महाराष्ट्रातील नामवंत जनसंपर्क तज्ञ व संत साहित्याचे अभ्यासक आहेत.)**



# आठवणी वारीच्या...



शुभदा पांडुरंग जोशी (वतनी)
संपर्क क्र.: 9503729405

आधुनिक केसरी

**आषाढी वारी... वारी म्हटलं की... आदर, श्रद्धेचे स्थान... अगदी बालपणा पासूनच वारकरी सांप्रदायचे संस्कार आम्हा वतनी कुटुंबातील सार्वांवर उपजतंच पेरले गेले... आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करत भगवंताचे विसमरण न होउ देता... गळ्यात तुळशीची माळ, भाळी चंदनाचा टिळा, अष्टगंध, बुक्का, धोती, सदरा... व टोपी असा पेहराव असणारे माझे आजोबा...**

ह.भ.प. माधव महाराज वतनी... परोपकार भाव व परमार्थ करून अखंड पांडुरंगाचे स्मरण करणे ही त्यांची दिनचर्या या अशा वारकरी संप्रदायात वाढलेली आम्ही भावंड या आषाढी वारीची आम्हाला नेहमीच उत्सुकता व आतुरता अगदी बालवयापासूनच असायची... आणि आता हि वाटते... वारीला मी कधी गेले नाही पण... आजी-आजोबांची वारीला जाण्याची चाललेली लगबग, पांडुरंगाला भेटण्याची घाई... ओढ मी अगदी जवळून पाहिले... त्यांच्या वारीचा नेम ते कधी चुकवत नसत, विठ्ठल दर्शनाची आस... व गुरुची भेट एकाच ठिकाणी होत असल्यामुळे त्यांना पंढरपूर क्षेत्राची ओढ ही कायम असायची...

आजोबामुळे आम्हा सर्वांना वारीची सखोल माहिती होती ते आम्हाला नेहमी वारकरी संप्रदायातील गोष्टी, अभंग, वारीतील प्रसंग, सांगायचे वारीतील रिंगण, धावा, अश्व रिंगण पालखी सोहळा, वेगवेगळ्या संतांच्या आपआपल्या गावाहून आलेल्या पालख्या, ज्ञानदेवाची पालखी, तुकोबाची पालखी, वारीतील पारंपरिक खेळ फुगडी पाऊले, अभंग, वारीतील शिस्त व ज्ञानोबा... माउली... तुकारामाचा जयघोष... भाव... प्रेम माऊली म्हणायचा मायाळूपणा आम्हाला ते नेहमी सांगायचे त्यामुळे वारी व पांडुरंग यांची आंतरिक ओढ आम्हा सर्वांनाच असायची. मागच्या दोन वर्षाच्या संकटानंतर या वर्षी अंत्यत उत्साहात दिंडीत सर्व वारकरी पायाला भिंगर बांधुन भक्तीच्या नादात दंग असलेला पाहताना हा दयाळू विठुराया प्रत्येक दिवसं दाखवून ऊर्जा देतो ही खात्री पटली, वारकरी संप्रदायात लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, जातीभेद हा कधीच आढळत नाही माऊली, माऊली म्हणत मंडळी देहभान विसरून या वारीत सामील होतात या शेकडो वर्षाच्या परंपरेने गेल्या दोन वर्षात घेतलेला विसावा. यावर्षी मनातील दाटलेल्या मेघांच्या आश्रुची वाट रिती करण्यासाठी देह, भान विसरून वारीतील तल्लीन ठेका धरणारा वारकरी, पांडुरंगाची सेवा करण्याच भाग्य ह्याच जन्मी मिळाल्याचा परमानंद घेत पाऊले पंढरीच्या दिशेने चालत असताना दिसत आहेत. दिंडया सोबतभोळ्या-भाबड्या वारकऱ्यांची सात्विक प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून विठ्ठलाच्या भरवश्यावर तो वारीसाठी देहभान विसरतो व विठ्ठल भेटी साठी आतुर असतो. वारकऱ्यांची साद पांडुरंगाला ऐकायलाच हवी , युगे अठ्ठावीस तू आमच्यासाठी कर कटेवर ठेवून उभा आहेस ना? मग खरंच खात्री पटली माऊली तूच तारणार, आणि पुन्हा आजोबा म्हणत असलेला अभंग आठवला...

**उरले ते एक देही मज आता,**
**अहो जी विठ्ठला माय बापा ||**
**तुका म्हणे आताकरी कृपादान**
**पाऊले समान दावी डोळा ||**

दरवर्षी नित्यनेमाने आषाढी कार्तिकी वारी येते आणि येताना आज्जी-आजोबांच्या असंख्य आठवणी घेऊन येते. त्यांच्या आठवणींनी मनाला एक अनामिक हुरहूर लागते. आवंढा कसाबसा गिळते, कळत नकळत डोळ्याच्या कडा पाणावतात. मनोभावे वारीच्या दिशेने दोन्ही हात जोडले जातात आणि रामकृष्ण हरि रामकृष्ण हरि हा संजिवन मंत्र आपसूकच मुखातून येतो.

**रामकृष्ण हरी**

# प्लास्टिक बंदीच्या कारवाईसाठी स्वतंत्र पथक !

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर शासनाने बंदी घातली आहे या पार्श्वभूमीवर धुळे मनपा पथकाकडून कारवाई केली जात आहे आतापर्यंत चाळीस हजाराच्यावर दंडही मनपा प्रशासनाने आकारला आहे, अशी माहिती मनपा उपायुक्त डॉक्टर संगीता नांदुरकर यांनी दिली आहे.

**आतापर्यंत चाळीस हजाराच्यावर मनपाने दंड आकारला**

शासनाच्या आदेशानुसार १ जुलैपासून प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी उपायुक्त डॉ. सुनीता नांदुकर यांच्याकडे आहे. त्यानुसार प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करत धडक मोहीम राबविण्यात येत आहे. तर बंदी घातलेल्या प्लास्टिक पिशव्या दुकानात आढळून आल्यानंतर मनपा प्रशासनाकडून दंड ही आकारण्यात येत आहे. तरी नागरिकांनी प्लास्टिक बंदीसाठी सहकार्य करावे नियमानुसार बंद असलेले प्लास्टिक बंद करावे, असे आवाहनही उपायुक्त डॉ. सुनिता नांदुरकर यांनी धुळेकर नागरिकांना केला आहे.



# दीर्घ रजेनंतर रुजू होताच सीईओ अजित पवार यांचा दंडील ग्रामसेवकास निलंबनाचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** सीईओंच्या सुनावणीला गैरहजर राहिल्यामुळे ग्रामसेवक बी.वाय.सिरसट यांना निलंबित करण्यात आले. दीर्घ रजेनंतर रुजू होताच सीईओ साहेबांनी पहिला दणका दिला खरा, परंतु साहेब शिक्षण विस्तार अधिकारी व ईतरही काही मंडळी निरनिराळ्या प्रकरणातील सुनावण्यांना सातत्याने गैरहजर राहतात तेंव्हा त्यांना निलंबित करुन काही दोषींवर तर केंव्हा गुन्हे करणार? असा सवाल जिल्ह्यातील सर्व सर्वसामान्य जनता आपणास विचारत आहे.

बीड जि.प. अंतर्गत येणाऱ्या बीड तालुक्यातील लक्ष्मीआई तांडा येथील ग्रामसेवक बी.वाय.सिरसट यास कामकाजातील अनियमितता, नळपट्टीच्या बोगस पावत्या, बांधकामांच्या मूळ संचिका गायब करणे, 15 वा वित्त आयोग मंजूर न करता बिल देणे, मासिक सभा न घेणे, वैयक्तिक व सार्वजनिक विहीरींचे बिले उचलून संबंधित अभिलेखे सादर न करणे यासह इतरही काही बाबींचा ठपका ठेवत बीड जिल्ह्याचे सीईओ अजित पवार यांनी संबंधित ग्रामसेवकास तडकाफडकी निलंबित केले. जे केले ते एकदम योग्यच आहे आणि तात्काळ केलेल्या कारवाई मुळे सीईओ साहेब आपले कौतुकच आहे.

**परंतु सीईओ साहेब शिक्षण विभागासंबंधीत असलेल्या टकले-सुळे-माटे-अंडील-राजपूत-आगळे-गर्जे-गिरी-यादव-राऊत-बहीर-आकुसकर-बिचकुले-वाघमारे-डोंगरे-महाजन व अन्य ठपकाधारकांवरती कारवाई कधी करणार?**

सीईओ अजित पवार यांनी जि.प.जिल्हा सेवा वर्तणूक नियम 1967 मधील नियमाचा भंग केल्याने आपण जि.प.जिल्हा सेवा शिस्त व अपील नियम 1964 मधील नियम ३ (१) नुसार विविध गैरप्रकारांच्या अनुषंगाने व सुनावणी-चौकशीस गैरहजर राहत सहकार्य न केल्याने संबंधित ग्रामसेवकास तडकाफडकी निलंबित केले. एकाच दिवशी १०-१५ प्रकरणात सुनावण्या घेतल्याने त्यांच्या कार्याचा सर्वत्र गवगवा होतो आहे. परंतु याच अनुषंगाने म्हणा अथवा धरतीवर म्हणा बीड जिल्हा परिषदेतील बघायला लागलेली कीड नितांत गरजेचे असताना व ज्यांच्या बाबतीत विविध प्रकरणांच्या माध्यमातून ठपका ठेवलेल्या, तसेच एक दोन एक दोन वेळा निलंबित झालेल्या अनेकांच्या सुनावण्या चौकशा आपल्या दालनात सुरू आहेत त्या मात्र एक-दोन वर्षापासून



प्रलंबित असून अगदी संत गतीने चालू आहेत हे असे का? एका विभागाला एक न्याय दुसरा विभागाला दुसरा न्याय असा अन्याय का सी ओ साहेब आपण एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे मग कर्तव्यात अशी कसूर का तेव्हा आपण अपात्र पदोन्नतीने शिक्षण विस्तार अधिकारी झालेल्या आणि अशा गोष्टींना खतपाणी घालणारे शिक्षण विभागातील इतर काही कर्मचारी-अधिकाऱ्यांपैकी जयलाल राजपूत, शिवाजी अंडील, ज्ञानेश्वर आगळे, परशुराम आरसुळ, सीमा खंडु टकले-काळे, गणेश महादेव गिरी, माटे-सुळे-गर्जे, अजय बहिर, सुधाकर यादव, रंगनाथ राऊत, ज्ञानेश्वर संतराम वाघमारे, श्रीमती.वैशाली आकुसकर, वर्षाराणी महाजन, सुवर्णालता डोंगरे आणि मंगल बिचकुले ई. शिक्षण विभागाशी संबंधित मंडळीवरती नानातऱ्हेच्या प्रकरणांमधील ठपक्यांमुळे या ना त्या चौकशीसाठी प्रकरणे दाखल आहेत. अनेकांचे निरनिराळे आरोप निवेदन-अर्जद्वारे आपल्या कार्यालयात प्रलंबित आहेत. मग यांच्या बाबतीत एवढी संथ गती का आणि कशासाठी? तेंव्हा सीईओ साहेब आपण मापात पाप न करता सर्वांना सारखाच न्याय देत याही लोकांचे प्रकरणे तातडीने हाताळून दोषारोप सिद्ध होताच यांच्यावरही कठोरात कठोर कारवाई करावी अशीच मागणी गेल्या पाच-सहा महिन्यांपासून संपूर्ण जिल्हाभरात चांगलीच जोर धरून आहे. तेंव्हा आपण आता याबाबतीतही कशी आणि काय पावलं उचलता याकडेच संपूर्ण बीड जिल्ह्याचे आणि जि.प. चे लक्ष लागून आहे!



# राष्ट्रीय टॅलेंट हंट शो "शहजादे हुनर के" ची भव्य घोषणागायन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी फेम अँड ग्लोरी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड द्वारे "शहजादे हुनर के" या भव्य टॅलेंट हंट शोची घोषणा करण्यात आली आहे. शहजादे हुनर के हा राष्ट्रीय टॅलेंट हंट शो आहे जेथे स्पर्धक नृत्य, गायन आणि मॉडेलिंग क्षेत्रात त्यांची प्रतिभा दाखवू शकतात, रिॲलिटी शो टेलिव्हिजन तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित केला जाईल. गायन, नृत्य आणि मॉडेलिंगसाठी हा एक राष्ट्रीय टॅलेंट शो आहे. या कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत सुधा चंद्रन, अभिनेत्री बिना बॅनर्जी, विद्याधर पाठक, रोहित फुक्टे आणि शरयू फुक्टे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भारताच्या पॉप आणि जॅझ आयकॉन उषा उथुप यांनी व्हर्च्युअल माध्यमातून मीडिया आणि सहभागींशी संवाद साधला.कार्यक्रमात अन्वी जोशीने गायन केले, तर ज्योती कांबळे हिने नृत्य केले आणि स्टेजवर प्रतिती बोलकाणी आणि गौरव लखानी यांनी रॅम्प वॉक केला. या प्रतिभावान कलाकारांनी शो अधिक सुंदर केला.

शहजादे हुनरचा असाच एक राष्ट्रीय टॅलेंट हंट शो भारतातील 30 शहरांमधील स्पर्धकांना गायन, मॉडेलिंग आणि नृत्यातील त्यांची खास शैली आणि प्रतिभा दाखवण्याची संधी देईल. शहर-केंद्रित शोच्या शेवटी, शीर्ष 18 कलाकारांची अंतिम फेरीसाठी निवड केली जाईल. निवडलेले अंतिम स्पर्धक झोनल फिनाले आणि ग्रँड नॅशनल फिनालेमध्ये भाग घेतील. वयोगट कनिष्ठ श्रेणीमध्ये 3 ते 13 वर्षे आणि वरिष्ठ श्रेणीमध्ये 13-25 वर्षे वयोगटातील आहे. निवडलेल्या सहभागींना व्यावसायिकांकडून ग्रूमिंग आणि प्रशिक्षण दिले जाईल. या शोची मूळ संकल्पना विद्याधर पाठक यांची आहे आणि युवा संघ रोहित फुकेटे आणि शरयू फुकेते दिग्दर्शित आणि व्यवस्थापित करणार आहेत.

या प्रसंगी, विद्याधर पाठक, एमडी, फेम अँड ग्लोरी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणाले, "शहजादे हुनर के" हा पहिला शो आहे जो स्पर्धकांना त्यांच्या शहरातील सेलिब्रिटींसमोर त्यांची प्रतिभा दाखवण्याची मोठी संधी देईल. टेलिव्हिजनवर त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी हजाराहून अधिक कुटुंबांसाठी एक व्यासपीठ. अभिनेत्री आणि कुशल नृत्यांगना सुधा चंद्रन म्हणाल्या की, मी स्पर्धकांना न्याय देणार नाही, मी त्यांची मैत्रिण बनून त्यांच्यातील कलागुणांना वाव देईन. हा शो कलाकारांच्या प्रतिभेला एक नवीन व्यासपीठ देईल.

अभिनेत्री बीना बॅनर्जी म्हणाल्या, जेव्हा मला या शोची ऑफर आली तेव्हा मी या शोच्या संकल्पनेने खूप प्रभावित झाले होते. आम्ही महानगरांपासून लहान शहरे आणि शहरांपर्यंत स्पर्धकांशी संपर्क साधू.

उषा उथुप म्हणाल्या, आपला देश हा प्रतिभेचा महासागर आहे, देशभरात एवढ्या मोठ्या संख्येने न्यायदान करणे खूप आव्हानात्मक असेल. मी सर्व विजेत्यांना सांगू इच्छिते की या स्पर्धेत सहभागी झालेले सर्व कलाकार हे विजेते आहेत. स्वतःच. आणि तुम्हीच विजेते आहात. बनून चित्रपटात पार्श्वगायन करावं लागत नाही. तुम्ही कलाकार म्हणून उदयास आलात हाच कार्यक्रमाचा उद्देश आहे.

# ग्रामीण भागातील पहिलवानांना कुस्त्यांची प्रतीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** कोरोनाच्या महामारीमुळे जवळजवळ एक वर्षांपासून ग्रामीण भागात यात्रा -जत्रा बंद आहेत. परिणामी कुस्त्यांची दंगल व बक्षिसांची लयलूट थांबली आहे. कुस्त्या बंद असल्याने पहिलवानांना कसरतीसाठी खाद्यपदार्थाचा खर्च डोईजड होत आहे. त्यामुळे आता ग्रामीण भागातील हजारो पहिलवानांना कुस्त्यांच्या दंगलीची प्रतीक्षा लागली आहे.

देवदेवता व ग्रामदेवतांच्या यात्रा- जत्रा साजरा करण्याची ग्रामीण भागात शेकडो वर्षांची परंपरा आजही कायम आहे. प्रसाद साहित्य, मनोरंजन, खाद्यपदार्थ आदींच्या उलाढालीबरोबरच मनोरंजन म्हणून लोकनाट्य तमाशा व कुस्त्यांची दंगल यात्रांमुळे रंगत असते. जिल्ह्यात वर्षभर विविध भागांत, गावोगावी विविध देवदेवतांचा यात्रोत्सव लोकवर्गणीतून केला जातो. विशेष उन्हाळ्यात ग्रामदेवतांच्या ग्रामीण भागातील यात्रा- जत्रा भरतात. कोरोनामुळे यात्रा बंद आहेत. ग्रामीण भागातील शेकडो पहिलवान विविध गावांच्या जत्रांमध्ये आपले कसब पणाला लावतात.

साधारणपणे ५१ रुपयांपासून २१ हजार रुपयांपर्यंत बक्षिसे असतात. काही ठिकाणी भांडी व विविध वस्तूंवर कुस्त्या लावल्या जातात. अनेक पहिलवान जिंकलेल्या पैशातून आपला खुराक भागवितात. नियमित व्यायामाबरोबर दूध, तूप, काजू, बदाम, मटण, मासे आदी खाद्यपदार्थ पहिलवान ताकद येण्यासाठी सेवन करतात. कुस्त्या बंद झाल्यामुळे पहिलवानही अडचणीत आले आहेत. काहींनी परिस्थितीअभावी नियमित व्यायाम बंद केला आहे.



**वर्षभरापासून कुस्त्यांची दंगल बंद आहे. कुस्त्यांमध्ये ५१ रुपयांपासून ते २१ हजार रुपयांपर्यंत रोख स्वरूपाचे बक्षीस विजेत्या पहिलवानास दिले जाते. यावर अनेक पहिलवान आपली गुजरान करतात. परंतु, कुस्ती बंद झाल्याने याचा परिणाम पहिलवानाच्या मेहनतीवर होत आहे. शासनाने यात्रा, जत्रा सुरू केल्यास ग्रामीण भागातील पहिलवानांना पुन्हा कुस्तीची संधी मिळेल.**

**योगेश जाधव, पहिलवान, देव्हारी**

**या गावांना होते कुस्त्यांची दंगल**

सावळदबारा, देव्हारी, देऊळगाव, पिंपळगाव वाखारी, देवळा, दिंडोरी, पिंपळगाव बसवंत, आंबेवाडी, मनमाड, नांदगाव, येवला, पाटोदा, लखमापूर, वलखेड, ढकांबे, नाळेगाव, आडगाव, भगुर, पानेवाडी, उगाव, नांदुर्डी, सावरगाव, खडकमाळेगाव, वसेवाडी, नैताळे, गाजरवाडी, कोठुरे आदी ठिकाणी कुस्तीचे नावाजलेले फड आहेत.

# आषाढी एकादशीनिमित्त रंगी रंगला पांडुरंग भक्तीगीत गजर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बीड बायपास परिसरात स्वर प्रथम प्रस्तुत रंगी रंगला पांडुरंग भक्तीगीतांचा गजर मैफलचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे हा सोहळा सुहास महाजन आणि परिवार आयोजित करीत असतो.

यामध्ये यावर्षी गायक व संवादिनी वादक प्रा. गजानन केचे, कु. युगन्धरा केचे, प्रथमेश महाजन व कु. नंदिनी महाजन गायन सेवा सादर करणार आहेत. त्यांना तबला संजय म्हस्के आणि संतोष केचे, बासरी निरंजन भालेराव, सिंथेसायजर



अरविंदकुमार, ऑक्टोपॅड आनंद आर्यन हे साथ संगत करतील तर संकल्पना व निवेदन सुहास महाजन, मधुबाला कदम सांभाळतील.

रंगी रंगला पांडुरंग हा कार्यक्रम सावित्री लॉन्स, बीड बायपास येथे सकाळी 9.30 वा. आयोजित करण्यात आला आहे. तरी परिसरातील भक्त, वारकरी, रसिक, नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे ज्ञानेश्वर सोनवणे, सुहास महाजन यांनी कळवले आहे.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे । आरोग्य । शिक्षण । पर्यावरण । सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार । सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम



सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष



रविंद्र बनकर
उपाध्यक्ष



अपर्णा मेहता
सचिव

अधिक माहितीसाठी : 7020577693 । holdinghands092@gmail.com

# आशा-बांधकाम कामगारांसह शोषितांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकपर्याय

## कामगार मेळाव्यात गोविंद आर्दड यांनी केली नव्या संघटनेची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या राजकारणाला कंटाळून कॉम्रेड गोविंद आर्दड यांनी नव्या संघटनेची घोषणा केली आहे. ही संघटना आशा स्वयंसेविका, गट प्रर्वतक, बांधकाम कामगार यांच्यासह शोषितांचे प्रश्न सोडविण्यासाठी झटणार असल्याचे गोविंद आर्दड यांनी सांगितले. आता केवळ आश्वासने नको तो हक्क हवा अशी साद घालत सत्याग्रहाचे पाऊल उचणार असल्याचे स्पष्ट करतांनाच त्यांनी येत्या 18 जुलै पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत तर चार दिवसीय संपाचा इशाराही यावेळी त्यांनी दिला आहे.

कॉम्रेड गोंविद आर्दड यांच्या वाढदिवसानिमित्त कामगारांचा मेळावा जुना जालन्यातील एका मंगल कार्यालयात घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे सामाजिक कायकर्तेतसेच महाराष्ट्र राज्य कृति समितीचे निमंत्रक श्रीमंत घोडके हेहोतेतर दीपक शेळके, गजानन पातरफळे, सुभाष मोहिते, मिना भोसले, मंदा तिनगोटेयांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आर्दड पुढे म्हणाले की, आशांसह कामगारांना किमान वेतन व कायम दर्जा मिळेपर्यंत नगर पंचायत ते दिल्ली पर्यंत संघर्ष करणार आहोत, आशा-बांधकाम कामगारांचे दुख आपण जवळून पाहिले आहे. त्यामुळे त्यांचे दुख दुर करण्याचा आणि त्यांच्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांचे प्रलंबित प्रश्न शासनासमोर मांडणार आहोत. वेळप्रसंगी संप, आंदोलनेही करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी आर्दड यांनी नव्या संघटनेची घोषणा करताना तिचे नाव लोकपर्याय सामाजिक संघटना असणार असल्याचे सांगतांना ही संघटना आशा-बांधकाम कामगारांसह शोषितांचे प्रश्न सोडविण्यासाठी झटणार आहे. कोणताही पक्ष सत्तेत येण्यापुर्वी आश्वासने देतो मात्र, सत्ता येताच दिलेली आश्वासने विसरुन जातो, कोणतीही सत्ता ही गरिबांची नाही ती मुठभर श्रीमंतांची असल्याचेही यावेळी ते म्हणाले.



या नव्या संघटनेच्या पाठीशी आशा-बांधकाम कामगारांनी खंबीरपणे उभेराहावे असेआवाहनही त्यांनी यावेळी केले. ही संघटना तुमचीच आहे. तुमच्या न्याय्य हक्कासाठी लढणार आहे. तुमच्यासाठीच्या थकलेल्या योजना त्यासाठीचे बजेट यासाठी ही संघटना संघर्ष करेल. आळशी प्रशासनाला जागे करण्यासाठी आता सत्याग्रहाची गरज असल्याचेही आर्दड यांनी स्पष्ट केले.

याशिवाय आशा-बांधकाम कामगारांच्या मागण्या घेऊन संघटनेचे शिष्टमंडळ जिल्हा प्रशासनाला भेटणार असून, येत्या 18 जुलै पर्यंत मागण्या मान्य न केल्यास दि. 18 ते 21 असा चार दिवसीय संप पुकारण्याचाही निर्धार त्यांनी या मेळाव्यातून केला आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत घोडके यांनी पुण्यातील त्यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडतांना तेथे आशा व बांधकाम कामगारांना काय-काय फायदे मिळतात या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच इतर संघटनेत असतांना येणाऱ्या अडचणींवर त्यांनी भाष्य करतांना त्यांनी तिथे मोबाईल जरी घ्यायचा तर वरच्या पदाधिकाऱ्यांना विचारावे लागते. तेथे अतिरेक झाला होता.

लोकपर्याय या सामाजिक संघटनेला साथ द्या अशी हाक देतांना या संघटना महाराष्ट्रराज्य कृति समितीशी संलग्न झाली आहे. तुम्हाला तुमची ताकद निर्माण करावी लागेल. जिथे संघटना मजबूत तिथे तुम्हाला फायदा नक्की मिळणार. आशा-गट प्रवर्तक यांची एकी पाहिजे त्यामुळे सर्व गोष्टी वेळेवर मिळण्यास मदत होईल. बांधकाम कामगारांनी घरकुलांचे अर्ज भरण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. मा. कोर्टाने मंजूरी दिली असल्याचे सांगतांनाच बांधकाम कामगारांसाठी चार हजार आठशे कोटी रुपयांचे बजेट बाकी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. लोकपर्याय सामाजिक संघटना हे भविष्य आहे. संघटनेच्या पाठीशी मजबुतीने उभे राहण्याचे आवाहनही त्यांनी आशा-बांधकाम कामगारांना केले.

यावेळी आशा वर्कररेखा सपकाळ, संजिवणी मोहिते, लता वाघमारे, अर्चना सोसे, रेणुका सिरसाठ, लता माने, सुजाता छडीदार, मीना ढोसले, रेणुका तिडके, मंदा पिनगोटे, आदीत पंडीत यांच्यासह अनेक आशा-बांधकाम कामगारांनी मनोगत व्यक्त केले. सर्वांनी लोकपर्याय सामाजिक संघटनेच्या घोषणेचा स्विकार करतांना यापुढे गोविंद आर्दड यांच्या पाठीशी ठाम पणे उभे राहणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

गोंविद आर्दड यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कवी कृष्णा आर्दड यांनी केले तर आभार सुहास मोहिते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्पना आर्दड, अजित पंडीत, रेखा सपकाळ, सुधाकर कोथळकर, गजानन शिंदे, बाळु आर्दड, सिद्धेश्वर मोहिते, संतोष भानुसे, रामेश्वर ढेरे, शेख अहमद, आसाराम आर्दड, अंशीराम गणगे आदींनी परिश्रम घेतले.




## द जैन इंटरनॅशनल स्कूल तर्फे "फाऊंडर्स डे" निमित्त विद्यार्थ्यांनी केली वाहतुकीच्या नियमाबद्दल जनजागृती आणि वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** द जैन इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'फाउंडर डे" निमित्त गजानन महाराज मंदिर चौक तसेच दर्गा चौक येथे वाहतुकीच्या नियमाबद्दल सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती केली तसेच स्थानिक वाहतूक पोलिसांना मदत केली. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती अभियान राबवले.

यानिमित्त काही विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण सुद्धा केले व पर्यावरणाचे संतुलन राखण्याचा संदेश दिला. यावेळी द जैन इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सिपल प्रवीण सोनवणे तसेच सी.ओ.ओ. शिखा श्रीवास्तव तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ.राहुल श्रीरामवार, क्रीडाशिक्षक अनिकेत शुक्ला, श्रद्धा खाजेकर तसेच समन्वयक दुर्गा शिंगणापूरकर, दीप्ती सराफ आणि रेखा सूर्यवंशी, ॠतुजा जाधव आणि प्रतीक एडके आणि समस्त विद्यार्थी उपस्थित होते.

## कलावंतांच्या तर्फे मूक आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दि.६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली, उस्मानाबाद जिल्ह्यातील सभासदांच्या व कलावंतांच्या तर्फे मूक आंदोलन करण्यात आले. या मूक आंदोलन करण्याचे कारण की, गेले दिड वर्ष अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाची निवडणूक झाली नाही त्यामुळे मराठवाड्यातील सभासद संभ्रमात आहेत म्हणून निर्माते चंद्रकांत कायंदे यांनी पुढाकार घेतला व दिग्दर्शक कृष्णा शरणागत व आप्पासाहेब मुरमे यांनी मराठवाड्यातील सदस्यांना एकत्र करण्यास विशेष सहकार्य केले.

या मूक आंदोलनात ही मागणी करण्यात आली आहे की, चॅरिटी कमिशनर यांनी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळावर प्रशासक यांची नियुक्ती करावी व प्रशासक यांच्या मार्फत चित्रपट महामंडळाची निवडणूक घेण्यात यावी याच मागणीचे निवेदन सुद्धा अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ कोल्हापूर, मुंबई, पुणे, औरंगाबाद व धर्मादाय आयुक्त कोल्हापूर, यांना देण्यात आले आहे व यावर लवकर निर्णय झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल हा इशारा देण्यात आला. त्याची प्रत सोबत जोडत आहे व हे आंदोलन करण्यास विविध जिल्ह्यातील जे सभासद उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत कायंदे, कृष्णा शरणागत, सुरेश गिरी, जॉन भालेराव, ज्ञानेश्वर वाघ, गणेश लोळगे, हनुमंत खिस्ते, सुनील कांबळे, गणेश वाघ, नंदू पारखे, सांडू शेठजी कायस्थ, अप्पासाहेब मुरमे, विजय सांगळे, समाधान बिथरे, अनुराग इंगोले, लक्ष्मण राऊत, राहुल दाभाडे, दिपक गिरी, कान्होपात्रा पंडित, प्रल्हाद हिंगे, गणेश बागल, बंडू खंडागळे, सुनील कुंडगीर, सूरज थोरात, पल्लवी बनसोडे, संजय बाविस्कर यांनी सहभाग नोंदवला. या आंदोलनाचे व्हिडिओ व फोटोग्राफी विजय साळवे यांनी केली तर जॉन भालेराव यांनी प्रसिद्धीची जबाबदारी पार पाडली.




## नसरापूर गावातील महावितरण कर्मचाऱ्याने केली विद्युत वाहिनीवर आलेल्या झाडाची छाटणी



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आज नसरापूर महावितरण कर्मचाऱ्याने नसरापूर ते वेल्हे रोड वरील ज्या दुतर्फा लघुदाब विद्युत वाहिन्या आहेत. त्यावरील आलेल्या झाडाच्या फांद्या वेली पूर्णपणे छाटणी केली कारण पावसाळ्याचे दिवस आहेत. व त्यामुळे अवकाळी वादळी वाऱ्याचा वेग वाढला आहे.

त्यामुळे जी झाडे व त्याच्या फांद्या पडून विदूतवाहिनी तुटु शकते व त्याच्या मुळे होणारे अपघात व विजेची तार तुटुन मानवाच्या जीवाला होणार धोका निर्माण होऊ शकतो. त्यासाठी नसरापूर गावातील महावितरण वरीष्ठ तंत्रज्ञ कर्मचारी समीर मुजावर व कैलास मोहिते वायरमन आणि नसरापूर शाखेचे सर्व सहकारी कैलास भोये, महेश बांदल, संतोष नाईलकर, राजकुमार कदम व सात ते आठ लोकांच्या टीमने नसरापूर गावातील लोकांच्या, ये-जा करणारे प्रवाशी, शाळेचे विद्यार्थी हितासाठी व जीवाला धोका होऊ नये म्हणुन या नसरापूर गावाच्या दोनी बाजुस लघुदाब विद्युतवाहिनी वरील पूर्ण झाडे छाटून त्यांनी विद्युतवाहिनी सुरळीत केली आहे. जेणे करून पावसाळ्याच्या दिवसात नसरापूर गावामधील नागरिकांना व ग्रामस्थांना अंधारात बसण्याची वेळ येणार नाही व नसरापूर ग्रामस्थांनी नसरापूर महावितरणचे आभार मानले आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# 'कार्य स्वच्छतेचे', उपमा मात्र कचऱ्याची..!!

आधुनिक केसरी न्यूज

**म्हस्के**

**जामनेर :** झपाट्याने वाढत असलेल्या शहरीकरणाला आता सध्या स्मार्ट सिटीची जोड मिळाली आहे. उंच-उंच इमारती भल्या मोठ्या निवासी सोसायटी, त्याचप्रमाणे अत्याधुनिक सोयीसुविधा संहित बऱ्याच काही गोष्टी. आकर्षकतेला कल्पकतेची ही मिळालेली खरी जोड आहे आणि यात वास्तव्य करणे म्हणजे आयुष्य सार्थक झाले असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही.
समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण व्हावी, यासाठी सद्या अनेकांची धडपड सुरू असते. एका प्रकारे हि स्पर्धाच म्हणावी.
फार वेगाने मानवी जिवणात होत गेलेल्या बदलांमुळे, प्रगतीच्या अनेक पायर्या आपण चढलोत. मात्र त्या प्रमाणे सामाजिक जबाबदारीचे भान आपण हरवून बसलोय, हि खरी शोकांतिका आहे... आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या संपूर्ण यंत्रणा स्वच्छतेसाठी कार्य करत असतात. विविध पदांवरील अधिकारी वर्ग तसेच कर्मचारी, सफाई कामगार यांच्या साहाय्याने प्रत्येक भागात सतत काम चालू असते... पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध असुन देखील अनेक भागात आपल्याला घाणीचं साम्राज्य बघायला मिळतं. पुरेशी यंत्रणा उपलब्ध असुन देखील कचर्याचे डोंगर दिवसेंदिवस वाढत आहेत. प्लॅस्टिक वापरावर बंदी असुन देखील ते बिंधास्त पणे सहज रित्या उपलब्ध होत आहे.
वैयक्तिक जिवनावर याचा थेट परिणाम होत नसल्याने, आपण सारेच गाफील आहोत. मात्र भविष्यात येणाऱ्या द्रुष्ट चक्रात पुढील पिढी अशी अडकली जाईल. कि भुतकाळातल्या मानवांवर कलंकित पणाचा ठपका कायम ठेवला जाईल. आरोग्य विभाग या बाबतीत फार गांभीर्याने विचार करत आहे. त्या प्रमाणे पुर्व नियोजनासहीत कामे देखील पुर्ण केली जात आहेत. मात्र अजूनही जनसामान्यांच्या मनावर या गोष्टींचा भर पडलेला आपल्याला दिसून येत नाही. दररोज आपल्यापर्यंत यंत्रणेची कचरा गाडी येत असतांना देखील त्याच गल्लीच्या एका टोकाला बिंधास्त पणे कचरा टाकला जातो.
चार ते आठ दिवसांचा घरगुती कचरा, हॉटेल, भाजी विक्रेते व्यवसायातील उरलेले सारेच काही त्या जागी टाकले जाते. दैनंदिन कचरा संकलन करण्यासाठी दिलेला पूर्ण भाग झाल्यानंतर, नागरीकांच्या बेपरवाईने जागोजागी तयार झालेले घाणीचे ढिग, कांहीही विचार न करता सफाई कामगार ते साफ करून घेऊन जात असतात. असल्या घाणीत हात घालून ते काम करणाऱ्यांनाच 'कचऱ्यावाले' म्हणून हिनवलं जातं हि खरी निंदनीय बाब आहे. घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या साऱ्याच यंत्रणेतील कर्मचारी, कामगारांना हि ऊपमा, आजच्या सुजान नागरिकांनी दिलेली आहे. शुल्लक कारणावरून सारख्या तक्रारी करुन अशा कामगारांना वेठीस धरले जाते. परंतु कुठल्याही परिस्थितीत आरोग्य कर्मचारी व सफाई कामगार आपली जबाबदारी झटकत नाहीत हि वस्तुस्थिती आहे.
मात्र काही सामाजिक मूल्ये जपणे देखील नागरीकांचे कर्तव्य आहे. हि बाब सर्वच विसरत असतात. ज्या सार्वजनिक ठिकाणी, 'येथे कचरा टाकु नये' असे फलक लावले असते. त्याच ठिकाणी लोक कचरा टाकतांना आढळून येतात. यांतून खरे कचर्यावाले कोण? हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारानं गरजेचं आहे... स्वच्छ सर्वेक्षणा अंतर्गत, कचरा वर्गीकरण, शून्य कचरा प्रणाली, होम कंपोस्टींग, याबाबत माहिती देऊन जनजागृती तसेच अनेक उपक्रम राबविले जात आहेत. परंतु नागरिकांनी यासाठी आपली सकारात्मक मानसिकता तयार करणं फार गरजेचे आहे.



# गावठी कट्टा दाखवताना गोळी भावजयीच्या डोक्यातून आरपार

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** भावजयीला गावठी कट्टा दाखवताना दिराकडून ट्रिगर ओढलं गेल्याने गोळी थेट भावजयीच्या डोक्यातून आरपार झाल्याची धक्कादायक घटना घडली.
अहमदनगर जिल्ह्यात ही दुर्दैवी घटना घडली आहे. गंभीर जखमी झालेल्या भावजयीवर रुग्णालयात उपचार उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला असून फरार झालेल्या आरोपी दिराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.
कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथे गुरुवारी (७ जुलै) सकाळी ही घटना घडली आहे. याबाबत प्रत्यक्षदर्शी कुटुंबियांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल भालेराव हा महिलेचा दिर आहे. त्याने बाहेरून गावठी कट्टा आणला होता. हा गावठी कट्टा भावजयी सुनिता भालेराव (वय ३२) यांना दाखवत असताना आरोपीकडून ट्रिगर ओढला गेला आणि गोळी सुनिता भालेराव यांच्या डोक्यात आरपार घुसली. घटना घडल्यानंतर आरोपी दिर घटना स्थळावरून पसार झाला.
घटनेची माहिती समजताच शिर्डीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय सातव, पोलीस उपनिरीक्षक देविदास माळी, सहायक पोलीस उपनिरीक्षक संभाजी पाटील, पोलीस हवालदार नितीन सानप, रमेश शेख, बाळकृष्ण वर्पे आदींनी घटनास्थळी धाव घेतली.
रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सुनिता यांना आगोदर खाजगी रुग्णालयात, त्यानंतर शिर्डी आणि नंतर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. गोळी थेट डोक्यातून आरपार घुसल्याने सुनिता भालेराव या गंभीर जखमी झाल्या होत्या. दरम्यान, आरोपीचा शोध घेण्यासाठी शिर्डी पोलिसांचे पथक रवाना झाले. मात्र, उपाचार सुरू असताना सुनीता भालेराव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर फरार झालेला आरोपी दिर विशाल भालेराव याला पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले आहे.



केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांची भेट घेऊन महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेचे उपाध्यक्ष मा.आ.श्रीकांत जोशी यांनी मराठवाड्याला पहिला ॲथलेटिक्सचा सिंथेटिक ट्रॅक मंजूर केल्याबदल त्यांचे अभिनंदन केले. मराठवाड्यातील सर्व खेळाडू, क्रीडा रसिक यांच्या अनुराग ठाकूर त्यांच्याकडून अपेक्षा वाढल्या असल्याची जाणीवही या निमित्ताने त्यांना करून दिली व त्यांना संभाजीनगरला येण्याचे आमंत्रणही दिले. मराठवाड्यातील क्रीडा क्षेत्राला आता 'अच्छे दिन' आले आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही..!

# घाणेगाव तांडा येथे थोडेसे मायाबापासाठी उपक्रम निदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील घाणेगांव तांडा येथे आज ग्रामपंचायतच्या वतीने उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये थोडेसे मायबापासाठी उपक्रम अंतर्गत जेष्ठ नागरिक कक्ष स्थापन व वयोवृद्धासाठी सर्व सेवा म्हणून निदान शिबीराचे आयोजन सरपंच रत्नाताई चव्हाण व उपसरपंच अंजनाबाई जाधव यांनी हा उपक्रम घडवून आणला.
"थोडेसे मायाबापासाठी" निदान शिबीर उपक्रम अंतर्गत जेष्ठ नागरिकासाठी ग्रामपंचायत कार्यालयात स्पेशल कक्ष स्थापन करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. व्ही.पी. राजपूत यांनी निदान शिबिरात आलेल्या वयोवृद्ध नागरिकांना शुंगर, बिपीलोह, संसर्गजन्य आजार याविषयी वयोवृद्धाना मार्गदर्शन केले आणि परिसरातील व गावातील वयोवृद्ध तपासणी करून योग्य त्या गोळ्या औषधी दिली. यामध्ये दमा, सर्दी, थंडी, ताप, शुगर या सर्व बिमारीवर औषधी व ओ.आर.एस. वाटप करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ नागरिक कक्षा मधे ग्रामसेवक एस.ए.रनसिंग यांनी मार्गदर्शन केले. तर सरपंच रत्नाताई चव्हाण व ग्रामपंचायत सर्व सदस्यांनी जेष्ठ नागरिकांचे शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून सन्मान करण्यात आला.
जेष्ठ नागरिक कक्षामध्ये बसण्यासाठी खुच्र्या, सतंरजी, पाण्याचा जार, वाचन साहित्य, टाळ, मुंदृग, तबला, पेटी, विना ईत्यादी साहित्य या कक्षात ठेवण्यात आले आहे. व अशा प्रकारे सर्व रोग निदान शिबीर संपन्न झाले. यावेळी सरपंच रत्नाताई चव्हाण, उपसरपंच अंजनाबाई जाधव, सुरेश चव्हाण, हिरा जाधव, लक्ष्मण पवार, गोविंद महाराज, ग्रामसेवक एस.ए. रनसिंग, डॉ. व्ही.पी. राजपूत, दवाखाना कर्मचारी व सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, शिपाई उपस्थित होते.




# देव्हारी ग्रामपंचायत येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील मौजे देव्हारी ग्रामपंचायत येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे. देव्हारी गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या सोडण्यासाठी ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे.
या प्रश्नांबाबत शासन गंभीर असून, ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या अनुषंगाने त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी देव्हारी ग्रामपंचायतने पुढाकार घेतला आहे. औरंगाबादसह राज्यातील सर्व जिल्ह्यात प्रत्येकी एक ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. येत्या पंधरा दिवसांत जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. कोरोना संसर्गामुळे सर्वच घटकांना फटका बसला असून, ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांच्या सर्व अडी-अडचणी तातडीने सोडविण्यासाठी देव्हारी ग्रामपंचायतच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे ग्रामपंचायत मध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आले आहे.
दरम्यान, देव्हारी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक सुरेश दैनिक केसरी चे प्रतिनिधी बहादुर चव्हाण यांच्याशी बोलत असताना सांगितले, ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आले आहे. याठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी लायब्ररी, आवांतर व समस्या सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक कक्ष सुरू केले आहे.

